किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा

'अर्थ'बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY LIBRARY
J1 | 3 | 07

३ ● स्फुल्लिंग

'ओपन सोर्स डेमॉक्रसी'

५ ● सामूहिक ज्ञानाच्या संधीकडे....

११ ● कहाणी विकिपीडियाची....

संकल्पना 'सेझ'ची, संघर्ष विचारांचा

१३ ■ 'सेझ'चे मूळ आणि त्याचे चिनी कूळ

१७ ■ 'सेझ' कायदा काय सांगतो....?

३२ ■ 'सेझ' आणि 'सार्वजनिक हित' यांचा संबंध 'रीमोट'

४२ ●'काल' चे 'आज'साठी

४५ ● अर्थबोधपत्रिका पुरवणी

(दृष्टीआडची अमेरिका - गोविंद तळवलकर)

खंड ५ : अंक १२ मार्च २००७

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**
**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**
वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका' दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.**


**वर्गणीसाठी पत्ता :**
**व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,**
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०
फॅक्स : २५६५७६९७
ई-मेल: ispe@vsnl.net, ispe@vsnl.com



**अर्थबोधपत्रिका**
**खंड ५ (अंक १२) मार्च २००७**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


***'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?***
- उद्बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक
- हाताशी असणाऱ्या मोजक्याच वेळात जगाबद्दलचे भान वाढविणारी

***'अर्थबोधपत्रिके'चा हेतू***

प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.

***'अर्थबोधपत्रिका'कशी साकारते?***
- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. **यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे किती-तरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# स्फुल्लिंग

'स्पेशल इकॉनॉमिक झोन'नामक संकल्पनेने सध्या सर्वत्र धुमाकूळ घातला आहे. 'सेझ' असे जरी या भारदस्त संकल्पनेचे लघुरूप असले तरी त्यामुळे निर्माण झालेले वादळ मात्र लघू नसून महान आहे. 'सेझ'ची स्थापना, त्यासाठी करावे लागणारे जमीनसंपादन, त्यापायी शेतकऱ्यांमध्ये धुमसत असलेला असंतोष ही सारी त्या घोंघावत्या वादळाची केवळ दृश्य रूपे आहेत. आज 'सेझ'च्याविरुद्ध विरोध-प्रतिकाराची जी आवर्ते उठलेली दिसतात त्यांचा सारा रोख या बाह्यात्कारावरच आहे. परंतु, या वादळाचे केंद्र ज्या वैचारिक संघर्षात दडलेले आहे त्याबाबत मात्र अजूनही फारसा विचारविमर्श झडत असल्याचे प्रकर्षाने आढळून येत नाही. हे केंद्र आहे 'आर्थिक विकास'नामक प्रक्रियेच्या सर्वसमावेशकतेचे. 'विकास' म्हणजे नेमके काय, त्याची न्याय्य व्याख्या काय, तो कसा घडून येतो, विकास कोण घडवतो, त्याची फळे कोण चाखतो, त्याची किंमत कोण मोजतो, विकासाचे लोणी मुखात पडण्याऐवजी ज्यांच्या तोंडी केवळ अंगाराचे तोबरेच येतात त्यांची व्यवस्था काय....असे सारे प्रश्न हे त्या केंद्राचेच पापुद्रे आहेत. 'सेझ'चे समर्थक आणि 'सेझ'चे विरोधक यांच्यादरम्यान संघर्षाच्या ज्या ठिणग्या सध्या उडताना दिसतात त्यांमधून केवळ धगच निर्माण होऊ नये तर, सम्यक् विचाराचे स्फुल्लिंगही त्यातून प्रकटावे, हीच कोणाही विचारी व्यक्तीची अपेक्षा असावी. म्हणूनच, मुळात 'सेझ' ही संकल्पना काय आहे, आपल्या देशात 'सेझ'च्या स्थापनेसाठी जी कायदेशीर चौकट तयार करण्यात आली आहे तिचे अंतरंग नेमके कसे आहे यांबाबत औरसचौरस मंथन होणे अतिशय अगत्याचे आहे. भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने याच हेतूने, 'सेझ कायदा आणि त्याचा अर्थ' या विषयावर अलीकडेच एका चर्चासत्राचे आयोजन केले होते. 'सेझ'च्या स्थापनेसाठी संसदेने मंजूर केलेल्या कायद्याचा, तसेच, सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती पी. बी. सावंत यांनी चर्चासत्रातील आपल्या प्रमुख भाषणात या कायद्याबाबत केलेल्या विश्लेषणाचा या अंकातील विस्तृत गोषवारा विचारप्रवर्तक आणि उद्बोधक ठरेल, असा विश्वास वाटतो.

# ANNOUNCEMENT

## INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

is pleased to announce the following scheme recently introduced for subscription of the ***Journal of Indian School of Political Economy (JISPE)*** for the Block Period of Three and Five years at a substantial concession resulting in huge savings (up to 33.3%) to the new as well as existing subscribers as under, provided that the subscription amount is remitted in lump-sum on or before June 30, 2007.

| ***Subscription Category*** | ***Yearly Subscription*** | ***Three Year subscription*** | ***Five Year Subscription*** |
|---|---|---|---|
| *Universities & Institutes* | *Rs. 600/-* | *Rs. 1500* | *Rs. 2000/- Plus ** |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 300/-*** | ***Rs. 1000/-*** |
| *Individuals & Colleges* | *Rs. 300/-* | *Rs. 750/-* | *Rs. 1000/-* |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 150/-*** | ***Rs. 500/-*** |
| *Savings Per cent* | *Nil* | *16.2%* | *33.3%* |

* Statistical supplement to the special issue of the JISPE on 'Political Parties and Election in Indian States : 1990-2003' comprising 335 pages and costing Rs.325/- absolutely free till stocks last.

**For more details write or email to:**

The Administrative Officer,
Indian School of Political Economy,
'Arthabodh', 968/21-22, Senapati Bapat Road,
Pune 411016

Email : ispe@vsnl.net — Phone - 25657132
Fax - 25657697 — - 25657210

## ओपन सोर्स डेमॉक्रसी

# सामूहिक ज्ञानाच्या संधींकडे....

ढासळणारे पर्यावरण आणि कोसळणारा समाज याबाबत आज चहूबाजूंनी काळजी व्यक्त करण्यात येत आहे. शिवाय दिवसेंदिवस ऊर्जेची मागणी वाढत असल्याने नैसर्गिक संसाधनांवरील ताणही वाढतो आहे. भविष्यात पाण्याचा प्रश्न गंभीर होत जाणार असून त्यावरून युद्धे होण्याची शक्यताही वर्तविली जात आहे. त्यातच वाढत्या लोकसंख्येच्या प्रश्नाची भर पडली आहे. पर्यावरणविषयक प्रश्न उग्र रूप धारण करीत असल्याने विकसित आणि विकसनशील देशांमधील मूठभरांची चंगळवादी जीवनशैली हाही चर्चेचा मुद्दा बनला आहे. या सर्व प्रश्नांचा ऊहापोह करणारे नवनवीन ग्रंथ अलीकडे वाचकांसमोर येत आहेत. यात आता आणखी एका पुस्तकाची भर पडली आहे. टॉमस होमर-डिक्सन * यांचा ***'दी अपसाइड ऑफ डाउन : कटॅस्ट्रफि, क्रिएटिव्हिटी अँड द रिन्यूअल ऑफ सिव्हिलायझेशन'*** हा ग्रंथ लक्षवेधी ठरतो आहे. कारण या पुस्तकाने समाजाचे आर्थिक, राजकीय व सामाजिक नेतृत्व करणाऱ्या मान्यवरांसमोर आव्हान उभे केले आहे. शिवाय सामान्य नागरिकांनाही कृतिशील होण्याची चालना दिली आहे.

अलीकडे, पृथ्वीचे वाढते तापमान हा काळजीचा विषय बनला आहेच. शिवाय अणुयुद्धाची टांगती तलवारही सर्वांना अस्वस्थ करते आहे. त्यातच वाढत्या आर्थिक विषमतेमुळे निर्माण होणारी सामाजिक अस्थिरता आणखी वाढेल, अशी भीतीही आहे. अशा प्रश्नांमुळे देशोदेशींच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक व्यवस्थांवरील ताण वाढणारच आहेत. या वाढत्या ताणांना या सर्व व्यवस्था कशा सामोऱ्या जातील, याचे चित्रही आजघडीला स्पष्ट नाही. असे असले तरी घाबरण्याचे कारण नाही, असे होमर-डिक्सन यांना वाटते. म्हणजे, त्यांच्या मते अशी संकटे येणारच नाहीत, असे नाही. मात्र ती उभी ठाकतील, तेव्हा मानवसमूहाची वाटचाल **सामूहिक ज्ञानाच्या (collective knowledge) संधींच्या** दिशेने होऊ शकेल आणि त्यामुळे काही चांगले पर्याय उपलब्ध होऊ शकतील. यात नवीन तंत्रज्ञानाचा, विशेषतः **'ओपन सोर्स सॉफ्टवेअर'**चा चांगला उपयोग करता येईल, असे प्रतिपादन करीत त्यांनी सर्वांचा आशावाद जागविला आहे.

आपले भविष्य घडविणे मानवाच्या हाती आहे आणि ही संधी मानवसमूह गमावणार नाही, असा विश्वास त्यांना वाटतो. म्हणजे, त्यांच्या मते 'संकटातून संधी'कडे (म्हणजे 'कटॅस्ट्रफि टू रिन्यूअल') जाण्याची दिशा निर्माण होऊ शकते. या प्रकाराला ते 'कॅटेजेनेसिस' (catagenesis) असे संबोधतात. तसेच आपल्या विचारांच्या पुष्ट्यर्थ ते एका घटनेचे उदाहरण देतात. अमेरिकेत, सॅनफ्रान्सिस्को येथे १९०६मध्ये भूकंप झाला तेव्हा अमेरिका व ब्रिटन या दोन्ही देशांमध्ये वित्तीय संकट निर्माण झाले होते. या संकटातूनच 'फेडरल रिझर्व्ह सिस्टिम'ची निर्मिती झाली. या एका घटनेमुळे अमेरिकेच्या भांडवलशाहीत सुधारणा घडून आल्या आणि आजच्या आधुनिक काळातील एक महत्त्वाची संस्था उदयास आली.

आजच्या प्रगत समाजाचे व्यवहार एका टप्प्यावर का ठप्प (ब्रेकडाउन) होऊ शकतात, याची कारणमीमांसा करताना होमर-डिक्सन यांनी काही संकल्पनांचा उल्लेख केला आहे. त्यात (१) energy return on investment -**EROI,** (२) panarchy theory, and (३)growth imperative ideas यांचा समावेश होतो.

$$(१)\ \textbf{EROI} = \frac{\text{पुरविण्यात आलेली एकूण ऊर्जा}}{\text{ऊर्जा पुरविण्याच्या प्रक्रियेत खर्च करण्यात आलेली एकूण ऊर्जा}}$$

म्हणजे, ऊर्जेची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी जे काही उपाय योजले जातील व त्यातून ऊर्जेचा जेवढा पुरवठा केला जाईल त्याच्या तुलनेत त्या पुरवठाप्रक्रियेसाठी जर जास्त ऊर्जा खर्च झाली तर ते अयोग्य ठरेल. पण आज नेमके हेच घडताना दिसते आहे. मग ऊर्जेचा प्रश्न सोडवायचा तरी कसा ? आणि हा प्रश्न सुटला नाही तर ऊर्जाकेंद्री जगाचे कसे होणार ?

(२) Panarchy Theory - समाज कोसळू शकेल एवढ्या गुंतागुंतीच्या व्यवस्था कशा आकाराला येतात, हे समजून घेण्यासाठी होमर-डिक्सन यांनी पुस्तकाची अनेक पाने खर्ची घातली आहेत. समाजव्यवस्था निर्माण होते, तिचा विस्तार होतो आणि

* टॉमस होमर-डिक्सन हे कॅनडातील टोरांटो विद्यापीठात राज्यशास्त्राचे प्राध्यापक असून Trudeau Centre for Peace and Conflict Studiesचे संचालक आहेत. यापूर्वी त्यांचे '*दी इनज्येन्युइटी गॅप अँड एन्व्हायर्नमेंट, स्केअरसिटी अँड व्हायोलेन्स*' हे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. '*ग्लोबल सिक्युरिटी अँड हाउ सोसायटीज् अडॅप्ट टू कॉम्प्लेक्स चेंज*' या विषयावर सध्या त्यांचे संशोधन चालू आहे. अमेरिकेचे माजी उपाध्यक्ष अल् गोर यांचे ते सल्लागार होते.

कालांतराने ती प्रगत होत जाते. साहजिकच तिच्यातील गुंतागुंत व परस्परावलंबन वाढत जाते. परिणामी ही व्यवस्था अशा अवघड वळणावर येऊन थांबते की तिच्या कुठल्याही एका घटकामध्ये दोष निर्माण झाला तर तो सर्वत्र पसरतो. त्यामुळे अशी समाजव्यवस्था कोसळण्याच्या शक्यता वाढतात. कधी ती कोसळल्यानंतर समाजाला नवसंजीवनी प्राप्त होते. कधी असेही घडू शकते की वाढीची व प्रगतीची अवस्था फार काळ लांबली तर तो समाज पारच कोसळतो. कारण, पुन्हा उभे राहण्याच्या शक्यतेपासून तो फार दूर गेलेला असतो. परिसरविज्ञानतज्ज्ञ बझ होलिंग यांच्या या panarchy theoryचा सविस्तर परिचय येथे लेखकाने वाचकांना करून दिला आहे.

(३) Growth Imperative Ideas- सध्या संपूर्ण जगाचे लक्ष आर्थिक वाढीभोवती केंद्रित झाले आहे. परिणामी, अधिकाधिक उत्पादन व अधिकाधिक उपभोग याला महत्त्व आले आहे. अशा परिस्थितीत समाजाची एकूण स्वस्थता (social well-being) कोणत्या मार्गाने मोजता येईल ? त्यासाठी नव्या संकल्पनांचा स्वीकार करावा लागेल का ? याबाबतचा दृष्टिकोण बदलला नाही तर काय होईल ?.... असे प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. या तीन बाबींचा वेळीच विचार झाला नाही तर समाज कोसळण्याच्या शक्यता वाढतात, असे म्हणण्यात आले आहे.

होमर-डिक्सन यांच्या मते, खरे तर, माणूस हा मुळात कल्पक, संवेदनशील व लवचीक आहे. परिस्थितीनुसार बदलण्याची तसेच नवनिर्मिती करण्याची त्याची क्षमता आहे. पण त्याच्या कल्पकतेला, लवचिकतेला संधी मिळण्यासाठी आपल्या आर्थिक, राजकीय व सामाजिक व्यवस्था या असाव्या तितक्या आणि तशा लवचीक नाहीत, बदलांना सामोरे जाण्यास त्या चटकन तयार होत नाहीत. अशा परिस्थितीत **'टेक्टॉनिक स्ट्रेसेस'** निर्माण होतात. यांत प्रामुख्याने पाच प्रकारच्या ताणांचा समावेश करता येतो (१) ऊर्जेचे संकट - विशेषत: तेलाच्या तुटवड्यामुळे उद्‌भवणाऱ्या समस्या (२) जागतिक पातळीवर असणारी आर्थिक अस्थिरता व देशोदेशींच्या नागरिकांमधील आर्थिक विषमता यांमुळे निर्माण होणारे प्रश्न (३) गरीब व श्रीमंत देशांमधील लोकसंख्यावाढीतील तफावत तसेच गरीब देशांमधील महाकाय नगरांमुळे निर्माण होणारा ताण (४) पाणी, जमीन, वन आदी नैसर्गिक संपत्तींच्या अतिवापरामुळे पर्यावरणाचा होणारा ऱ्हास आणि (५) पृथ्वीच्या वातावरणातील बदलांमुळे हवामानात होणारे बदल व त्यातून निर्माण होणारे प्रश्न. या **'टेक्टॉनिक स्ट्रेसेस'**मुळे आजचे समाजजीवन संपुष्टात येण्याच्या शक्यता नाकारता येत नाहीत.

यापूर्वी असाच इशारा जॅरेड डायमन्ड या अभ्यासकाने आपल्या '*कोलॅप्स : हाउ सोसायटीज् चूझ् टू फेल ऑर सक्सीड*' या ग्रंथाद्वारे दिला होता (पहा - 'कोसळणारा समाज', 'अर्थबोधपत्रिका', जुलै २००६). मार्टिन रीस यांनी '*अवर फायनल सेंचुरी-*' या ग्रंथातही असा विषय हाताळला आहे. पण 'दी अपसाइड...' या दोन्हींपेक्षा वेगळे आहे. कारण, होमर-डिक्सन यांनी समाजात 'ब्रेकडाउन' होऊ नये (म्हणजे जॅरेड डायमन्ड यांच्या भाषेत समाज कोसळू नये), म्हणून काय करता येईल, यासाठी पुढील चार मार्ग ग्रंथात सुचविले आहेत - (१) **'टेक्टॉनिक स्ट्रेसेस'** कमी करणे (२) व्यक्तीव्यक्तींनी **'प्रॉस्पेक्टिव्ह माइंड'** तयार करणे (३) संकटे टाळण्याच्या दृष्टीने **यंत्रणेत लवचिकता** आणणे (४) समाजव्यवहार ठप्प होण्याच्या **संभाव्य शक्यतांबाबत सतर्कता** बाळगून कृती करण्यास सज्ज असणे.

यांपैकी पहिल्या व तिसऱ्या मार्गाबाबत देशोदेशींची सरकारे बरेच काही कार्य करू शकतात. असे काही कार्य चालूही झाले आहे. उदाहरणार्थ - उत्पादनांच्या निर्मितीप्रक्रियेद्वारे वातावरणात सोडण्यात येणाऱ्या कार्बन वायूचे प्रमाण कमी कसे करता येईल ते पाहणे, पर्यायी ऊर्जानिर्मितीत गुंतवणूक करणे इत्यादी. याशिवाय, नागरिकांनी ऊर्जेचा वापर कमी करावा यासाठी काही उपाययोजना आखता येतील. सार्वजनिक वाहतूकव्यवस्थेत सुधारणा केल्यास इंधनवापरात बचत होईल, हे झाले याचे एक उदाहरण. जगभरातच शहरांची वाढ वेगाने होत असून या शहरांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी (विशेषत: ऊर्जा व पाणी) संपूर्ण व्यवस्थेवरील ताण वाढतो. त्याच वेळी ग्रामीण भाग दुर्लक्षित राहतो. या दोन्हींच्या विकासाचा समन्वय गाठण्यासाठी सरकारला व नागरिकांना पावले उचलता येतील. त्यासाठी धोरणात व यंत्रणांमध्ये लवचिकता आणता येईल. संकटे येतील हे गृहीत धरून, येणाऱ्या संकटांचे रूपांतर संधीमध्ये कसे करता येईल, याचा विचार करणे म्हणजे 'प्रॉस्पेक्टिव्ह माइंड'. दुसऱ्या शब्दात असेही म्हणता येईल की, भविष्यातील प्रश्नांबाबत विचार करून त्यानुसार आज प्रत्येकाने कृती करण्यासाठी प्रवृत्त होणे म्हणजे 'प्रॉस्पेक्टिव्ह माइंड'चे उपायोजन करणे होय. उदाहरणार्थ, पर्यावरणाचा विचार करून सातत्यपूर्ण विकास घडवून आणण्यासाठी नागरिकांनी व विविध समाजगटांनी कृतिशील असणे, पर्यावरणाशी मैत्री करणारे व्यवहार करणे. शिवाय जेथे सरकारी धोरणे या विरुद्ध जाताना आढळतील तेथे त्या सरकारवर (योग्य कृती करण्यासाठी) दबाव आणणे व जेथे सरकार कमी पडते तेथे अशी मूल्ये जोपासणाऱ्या नागरिकांनी नियोजनांत सहभागी होण्यासाठी

प्रयत्न करणे, असेही नागरिकांना करता येईल. तसेच, भविष्यातील प्रश्नांबाबतही आजच विचार करून ठेवायला हवा. म्हणजे, समजा एखादा देश अन्नधान्य फार मोठ्या प्रमाणावर आयात करीत असेल आणि जर युद्ध झाले व युद्धामुळे तसेच त्या वेळी निर्माण झालेल्या ऊर्जेच्या संकटामुळे वाहतूक यंत्रणा ठप्प झाली, तर त्या देशाला गंभीर संकटाला सामोरे जावे लागेल. म्हणून अन्नधान्याच्या किमान गरजेबाबत तरी सर्व देश स्वयंपूर्ण असावेत, अशी भूमिका नागरिकांनी व देशांनी आधीच घेऊन त्या दिशेने कृती करावयास हवी.

असे सर्व घडण्यासाठी नवविचारांची कास धरावी लागेल असे होमर-डिक्सन यांना वाटते. या सर्व प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा असून तो वाढावा यासाठी त्यांनी **ओपन सोर्स डेमॉक्रसी** ही संकल्पना पुढे आणली आहे. यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा - इंटरनेटचा - चांगला उपयोग होऊ शकतो. 'वर्ल्ड वाइड वेब'च्या (www) माध्यमातून आज जगातील नागरिक परस्परांशी जोडले गेले आहेत. जगासमोरील आव्हानांचा एकत्रितपणे विचार करण्यासाठी या 'वेब'चा उपयोग करून **हे नागरिक सामूहिक ज्ञानाच्या संधींकडे** जाऊ शकतात. म्हणजे, जागतिक पातळीवर काम करणारी **ओपन सोर्स डेमॉक्रसी** अस्तित्वात येऊ शकते, असे त्यांनी सुचविले आहे. तसेच या संदर्भात वेबवरील 'विकिपीडिया' या कोशाचे उदाहरण दिले आहे.

या कोशातील माहिती सर्वसामान्यांना उपलब्ध आहे एवढेच नाही तर त्यात भर घालून ती संपादित करण्याचाही अधिकार आहे. अशा नव्या ज्ञानाची भर विकिपीडियात घालण्यासाठी विशिष्ट पद्धत उपयोगात आणली जाते व हा माहितीचा साठा अधिक समृद्ध केला जातो. म्हणजे असेही म्हणता येते की, ज्ञान ही जर शक्ती असेल तर आज अनेकांजवळ ती ताकद आहे. या ज्ञानाचा उपयोग जगाच्या भल्यासाठी करण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे, याची जाणीव फक्त करून देण्याची गरज आहे. यासाठी सर्वजण संबंधित विषयांतील तज्ज्ञ असलेच पाहिजेत, असेही नाही. उदाहरणार्थ, वातावरणातील बदल हा विषय सर्वांसाठीच महत्त्वाचा आहे. या विषयात रस असलेल्या अनेकांजवळ याबाबतची माहिती असतेही, पण ते तज्ज्ञ असतातच असे नाही. अशा वेळी, अशा व्यक्तींनाही या चर्चेत सहभागी होण्याची संधी मिळाली तर त्यांच्याजवळच्या माहितीचा/ज्ञानाचा उपयोग इतरांना होईल. अशा सहभागातून अनेकांची कल्पनाशक्ती फुलेल व नवनवीन पर्याय पुढे येतील. अशा चर्चांना नेमकी दिशा देण्यासाठी व नागरिकांच्या कल्पनाशक्तीला शास्त्राची व व्यवहार्यतेची जोड देण्याकामी संबंधित

तज्ज्ञांना महत्त्वाची भूमिका बजावता येईल. या शिवाय जेव्हा संकटे निर्माण होतील तेव्हा कोणते ज्ञान व तंत्रज्ञान नेमकेपणाने व कमीतकमी वेळात कामाला येईल, याचाही विचार अशा चर्चांमधून करता येईल. त्यासंबंधीचे छोटे प्रयोगही करून बघता येतील. हे कसे करायचे हा प्रश्न आहेच, पण ते अशक्य मात्र नाही.

आज घडीला **ओपन सोर्स डेमॉक्रसी** व्यवहारात आणण्यासाठी चार प्रकारची आव्हाने आहेत. एक आहे winnowingचे. याला 'चाळणी लावणे' असे म्हणता येईल. अशी 'चाळणी लावणे' म्हणजे अशा चर्चांमधून ज्या अनेकानेक कल्पना व सूचना पुढे येतात त्यांतील सर्वोत्कृष्ट सूचना वेगळ्या करणे, त्यांचा प्राधान्यक्रम लावणे. दुसरे आव्हान आहे accumulationचे - ज्या कल्पनांवर काम करायचे असे ठरले असेल त्यांच्यावर काही ठराविक काळातच काम होणे अपेक्षित आहे. विकिपीडियाची कार्यपद्धती या दृष्टीने समजून घेणे गरजेचे आहे. काही मुद्दे वादग्रस्त ठरतात तेव्हा ती चर्चा काही काळासाठी खंडित करण्यात येते. चर्चा करणाऱ्या व्यक्ती आक्रमक होऊ लागल्या वा चर्चेची दिशा भरकटली तर विकिपिडियात सहभागी होण्याची संधी अशा व्यक्तींना नाकारली जाते. अशा प्रकारे कामात नेमकेपणा आणून नवी माहिती घालण्यात येते व जुनी माहिती काढण्यात येते. तिसरे आव्हान आहे hijackingचे. संकलित ज्ञानाची चोरी होणे, त्यात काही अनिष्ट बाबी घातल्या जाणे वा तत्सम कृती करणे असे घडू नये, याची काळजी घ्यावी लागणार आहे. ही तांत्रिक अडचण कशी सोडवायची हा कळीचा मुद्दा ठरणार आहे. या संदर्भात मूल्ये आणि वर्चस्व हे दोन प्रश्न **ओपन सोर्स डेमॉक्रसी**साठी महत्त्वाचे आहेत. कारण, सध्या यात अनेकानेक हितसंबंध गुंतलेले असले तरी शेवटी हा मूल्यांचा लढा असणार आहे. आपण आपल्या पुढच्या पिढ्यांची वाटचाल न्याय्य जगाकडे होऊ देणार किंवा नाही, हा प्रश्न येथे उपस्थित होतो. चौथे आणि शेवटचे आव्हान म्हणजे या सर्वांत तज्ज्ञांची भूमिका काय असणार आहे, हे ठरले पाहिजे. तज्ज्ञ आणि सामान्य नागरिक यांच्यातील दरी कमी होणे, हे यापुढे गरजेचे ठरेल, असे वाटते.

होमर-डिक्सन हे फक्त असा मार्ग सुचवूनच थांबलेले नाहीत. तर, ऊर्जा आणि वातावरणातील बदल या प्रश्नांबाबत पुढाकार घेऊन त्यांनी हा प्रयोग करण्यासही सुरुवात केली आहे. मानवसमूहाच्या भविष्याबाबत वेगळा विचार करण्यासाठी प्रेरित करणाऱ्या व आशावादी दृष्टिकोण जागविणाऱ्या होमर-डिक्सन यांच्या 'दी अपसाइड...'मधील विचारांना समाज आपलेसे करील ? ✿✿

# कहाणी विकिपीडियाची....

अनेकांना त्यांना भेटायचे असते, भेट नाही झाली तरी त्यांना बघायचे तरी असते, विविध प्रसारमाध्यमांत काम करणाऱ्यांचा गराडा त्यांच्याभोवती असतो. या सर्वांच्या मनात त्यांच्याबद्दल एक प्रकारचे कुतूहल दाटलेले असते. कारण, त्यांनी केलेल्या एका उत्कृष्ट उपक्रमाचा उपयोग माहिती व ज्ञानयुगात वावरणारे जगातील लाखो-करोडो नागरिक अक्षरशः रोज करीत असतात, त्यांच्या कामाला दाद देऊन त्यांचे कौतुकही करीत असतात. ही व्यक्ती आहे जिमी वेल्स - इंटरनेटवरील 'विकिपीडिया' नामक विश्वकोशाचे जनक.

आजपर्यंत मानवाजवळ जमलेला प्रचंड ज्ञानाचा साठा जगभरात सर्वांना काही क्षणांतच उपलब्ध होऊन त्याचा योग्य उपयोग त्यांना करता यावा, शिवाय त्या ज्ञानात स्वतःजवळची भर घालायची असल्यास तीदेखील घालता यावी, असा हा 'ऑनलाइन एन्सायक्लोपीडिया' साकारला जानेवारी २००१ मध्ये. पण या विश्वकोशाच्या कामाला गती मिळाली ती ११ सप्टेंबरच्या घटनेनंतर. अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ल्यानंतर या विश्वकोशाकडे या विषयाशी संबंधित विविध प्रकारची माहिती व लेखांची रीघच लागली. यानंतर 'विकिपीडिया'चे नाव जगभरात पोहचले. आता, कोणतीही महत्त्वाची घटना (उदाहरणार्थ, लंडनमधील बॉंबस्फोट) घडली की त्याची पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी लाखो नागरिक धाव घेतात ती 'विकिपीडिया'कडे. 'विकिपीडिया'चे आधीचे नाव होते 'न्यूपीडिया'. संगणकाच्या क्षेत्रात ओपन सोर्स सॉफ्टवेअरचा प्रवेश झाला, तेव्हा त्याचा उपयोग संपादनाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर करणे शक्य असल्याचे जिमी वेल्स यांना लक्षात आले. मग त्यांनी २०००मध्ये संगणकावर 'न्यूपीडिया' विश्वकोशाची निर्मिती करण्याचे ठरविले. हा विश्वकोश एकाच वेळी अनेक भाषांमध्ये उपलब्ध व्हावा असेही ठरले होते. यासाठी वेगवेगळ्या विषयांवर माहिती व लेख मागविताना त्यांना असे लक्षात आले की स्वेच्छेने लेख लिहिणाऱ्या व्यक्तींचे लेख परंपरागत पद्धतीने संबंधित समित्यांकडून, तज्ज्ञांकडून तपासून घेणे, लेखकाला तसे कळविणे व त्यात सुधारणा करणे, मग परत लेख मागविणे या प्रकारात लेखक फारसे उत्सुक नसतात. पण यासाठी दुसरा पर्याय पण सुचत नव्हता. मग, एके दिवशी

'न्यूपीडिया'साठी 'ऑप्शन्स ट्रेडिंग' या विषयावर ते स्वत: लेख लिहित असताना त्यांना एक कल्पना सुचली. तोपर्यंत 'विकी' ही वेबसाइट चालू झालेली होती. या वेबसाइटला भेट देणाऱ्या व्यक्तींना आपल्याजवळच्या माहितीची भर तेथे घालता येत होती वा तेथे असणाऱ्या माहितीत बदलही करता येत होता. याचा उपयोग करून न्यूपीडियाचे काम पुढे नेता येईल, अशी कल्पना जिमी वेल्स यांना सुचली आणि विकिपीडियाने आकार घेतला.

अशा प्रकारच्या विश्वकोशाची निर्मिती हा एक धाडसी प्रयोग होता. कारण, अशा पद्धतीने माहितीत भर घालण्याचा अधिकार कोणालाही देण्याने त्यातील माहितीची विश्वसनीयता आणि अचूकता याबद्दल शंका उपस्थित होणे स्वाभाविक होते. पण विकीपीडियाने हाही प्रश्न योग्य रीतीने सोडविला. इंटरनेटवर केवळ या कोशाचेच काम पूर्णवेळ पाहणाऱ्या व्यक्ती फक्त पाच आहेत, तर सुमारे ४०० 'ऑनलाइन व्हॉलण्टिअर' आहेत. हे सर्व जण ही अचूकता व विश्वासार्हता टिकविण्याच्या कामी मदत करतात. विकिपीडियातील विज्ञान व तंत्रज्ञानविषयक माहितीची सत्यता 'नेचर' या प्रसिद्ध नियतकालिकाने 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका'च्या तुलनेत तपासून बघितली. तेव्हा असे आढळले की 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका'च्या एका लेखात सरासरी तीन चुका आढळल्या तर विकिपीडियाच्या लेखात चार. याचा अर्थ विश्वकोशाचा असा 'ऑनलाइन' प्रयोग करतानाही त्याचा एक विशिष्ट दर्जा राखता येतो, हे सिद्ध झाले. या सर्व प्रयोगासाठी येणारा खर्च ही एक बाब होतीच. पण हा खर्च नागरिकांच्या देणग्यांच्या माध्यमातून भरून निघाला. इंटरनेटवरील जाहिरातींचा ओघ वाढत असतानाही विकिपीडियाने मात्र अजूनतरी जाहिरातींची मदत घेतलेली नाही. विकिपीडियाच्या स्थापनेनंतर दोनच वर्षांनी ते विकिमीडिया फौंडेशनला देणगी म्हणून देण्यात आले आहे. हा उपक्रम दुसऱ्या एखाद्या कंपनीला विकण्याची मात्र जिमी वेल्स यांची कोणतीच योजना नाही. *(पृष्ठ ३१ वर पाहावे)*

## दुरुस्ती

**'अर्थबोधपत्रिके'च्या फेब्रुवारी २००७ च्या अंकात 'वित्तीय चित्र राज्यांचे' या लेखाच्या (पृष्ठ क्रमांक २०) पहिल्या परिच्छेदात अभ्यासकाचे नाव 'किरण कर्णिक' असे प्रसिद्ध झाले आहे. ते नाव 'अजित कर्णिक' असे हवे. या चुकीबद्दल आम्ही दिलगीर आहोत. • संपादक**

# 'सेझ'चे मूळ आणि त्याचे चिनी कूळ

सध्या देशभरात गाजत असलेली 'सेझ'ची संकल्पना ही आपण चीनकडून आयात केली असे म्हटले जाते. चीन हा या संकल्पनेचा आद्य जनक आहे किंवा नाही, याचा शोध घ्यावा लागेल. परंतु, आर्थिक विकासप्रक्रियेच्या अथवा एकंदरच आर्थिक पुनर्रचनेच्या भरधाव गाडीचे इंजिनपद 'सेझ'ला बहाल करण्याची चिनी 'स्ट्रॅटेजी' मात्र आपल्याला भुरळ पाडून गेली, हे वास्तव नाकारण्यात अर्थ नाही. हे योग्य की अयोग्य याची चर्चा अशीच अनंत काळ चालू राहीलही. या ठिकाणी मात्र प्रयत्न केला आहे तो 'सेझ'ची ही संकल्पना मुळात आहे तरी काय, हे समजावून घेण्याचा. 'सेझ' कशासाठी, 'सेझ'चे फायदे काय, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत 'सेझ'ची नेमकी भूमिका काय, असे जे वेगवेगळे प्रश्न सध्याची रणधुमाळी बघताना आपल्या मनात उमटतात त्यांचे काही प्रमाणात तरी शमन त्यामुळे होईल, अशी आशा आहे. 'सेझ'च्या 'मॉडेल'चा जगभरच जो काही अनुभव आहे त्यावर ही चर्चा आधारलेली आहे.

'सेझ' आणि चीन असे समीकरण जरी आज आपल्या डोळ्यासमोर साकारलेले असले तरी ही संकल्पना प्राधान्याने केवळ चीनमध्येच रुजलेली आहे, असे अजिबात नाही. आजमितीस, जगभरातील सुमारे १२०पेक्षा अधिक देशांमध्ये 'सेझ' कार्यरत आहेत. यांमध्ये केवळ तिसऱ्या जगातील विकसनशील देशांचाच काय तो समावेश आहे, असे समजण्याचे मुळीच कारण नाही. अगदी जपान - अमेरिकेसारखे प्रगत आणि जागतिक अर्थपटलावर अग्रेसर असणारे देशही 'सेझ'च्या स्थापना-विस्तारात मागे नाहीत. या विशेष आर्थिक क्षेत्रांची जगभरातील संख्याही चांगलीच घसघशीत आहे.... चक्क चार हजार ! कोट्यवधींना थेट रोजगार आणि अब्जावधी डॉलर्सची निर्यात या 'सेझ'द्वारे देशोदेशी निर्माण झाली आहे, होत आहे. 'सेझ'स्थापनेचे प्रत्येक देशाचे 'लॉजिक' स्थलकालपरत्वे वेगळे असावे यात नवल काहीच नाही. मात्र तरीही 'सेझ'च्या स्थापनेमागील काही मूलभूत प्रेरणा व उद्दिष्टे ही जगाच्या पाठीवर समानच असल्याचे दिसते. वस्तुनिर्माणप्रधान आणि निर्यातोन्मुख उद्योगांना स्पर्धात्मक आणि दमदार वाढीस

पूरक असे वातावरण (किमान काही विविक्षित भूभागात) उपलब्ध करून देणे, परकीय गुंतवणूक तसेच परकीय चलन आपल्या अर्थव्यवस्थेकडे आकर्षित करणे, रोजगार निर्मितीस जोरदार बढावा देणे आणि आर्थिक विकासास अत्यावश्यक असणाऱ्या पायाभूत सेवासुविधा आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान यांच्या वाढविस्तारास आणि आयातीस चालना देणे... या त्या मुख्य आणि किमान समान प्रेरणा. जागतिकीकरणाच्या आज विश्वव्यापक झालेल्या प्रक्रियेतच या प्रेरणांची मुळे रुजलेली आहेत.

आजच्या परस्परावलंबी आणि परस्पराश्रयी जगात 'एकला चालो रे' धर्तीचे अर्थकारण कोणत्याही देशास परवडणारे नाही. वैश्विक अर्थव्यवस्थेचा एक घटक म्हणून टिकावयाचे असेल तर जागतिक बाजारपेठांशी आपल्या देशी अर्थव्यवस्थेची नाळ जोडून देणे, हे आज जगभरातील सर्वच देशांसाठी अनिवार्य ठरत आहे. हे साध्य करण्यासाठी देशी अर्थकारणाची पुनर्रचना करण्याबरोबरच एकंदर अर्थकारणामागील मानसिकताही बदलणे गरजेचे होत आहे. देशी उद्योगांची वैश्विक स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी एकंदरच देशी उत्पादनव्यवस्थेचे आधुनिकीकरण अगत्याचे. त्यासाठी हवे प्रगत, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि भांडवलाचे भरभक्कम इंजेक्शन. विशेषतः तिसऱ्या जगातील विकसनशील देशांमध्ये नेमकी याच उभय बाबींची वानवा. प्रगत तंत्रज्ञान आयात करावे म्हटले तरी त्यासाठी परकीय चलनाची पुंजी चांगली गुटगुटीत हवी. हे परकीय चलन मिळविण्यासाठी जोमदार निर्यात हवी. त्यासाठी देशी उद्योगांची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धात्मकता चांगली तगडी हवी. त्यासाठी प्रगत उत्पादन तंत्राचे हस्तांतरण विकसित देशांकडून विकसनशील देशांकडे व्हावयास हवे. परकीय भांडवल तसेच गुंतवणुकीस जर का अर्थव्यवस्थेचे दरवाजे उघडले तर आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचा प्राणवायू असणारे भांडवल आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान या उभयतांची उपलब्धी आयतीच सुलभ होते. मात्र, जोवर देशी अर्थकारणाची चौकट पोलादी आहे, नानाविध नियंत्रणे-नियमांची जाळी-जळमटे ठायीठायी पायात येत आहेत तोवर परकीय भांडवल वा तंत्रज्ञान देशी अर्थव्यवस्थेत पाऊल घालणार नाही. नियंत्रणांचा माहौल संपूर्ण अर्थव्यवस्थेमधून एकाच वेळी संपुष्टात आणणे हे व्यावहारिकरीत्या कठीण असल्याने निदान काही भूभाग तरी परकीय भांडवल, तंत्रज्ञान, असे तंत्रज्ञान पुरविणाऱ्या कंपन्या यांना स्वच्छ आणि खुला करून द्यावा या मानसिकतेमधून आणि व्यावहारिक निकडीमधून 'विशेष आर्थिक क्षेत्रां'ची (स्पेशल इकॉनॉमिक झोन - एसईझेड - सेझ) संकल्पना निपजली असावी, असा कार्यकारणभाव सिद्ध करण्यास

पुरेसा वाव आहे. परंतु, केवळ जाचक, साचेबंद, पोलादी कायदेकानूंची कोळीष्टके साफसूफ केल्याने भागत नाही. परकीय उद्योगांना त्यांच्या कार्यक्षम व्यवहारांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सेवासुविधाही आवश्यक असतात. संपूर्ण अर्थव्यवस्थेत अशा दर्जेदार पायाभूत सेवा एकाच वेळी सर्वत्र पुरविणे हे भांडवलाअभावी शक्य नसल्याने निदान विशेष आर्थिक क्षेत्रात तरी त्या गुणवत्तेच्या सुविधा पुरविल्यास परकीय भांडवलास तेथे येण्यास प्रोत्साहन मिळेल, अशा वास्तव दृष्टिकोणातून अव्वल सेवासुविधांचा पुरवठा हे 'सेझ'चे आणखी एक व्यवच्छेदक लक्षण ठरते. सुलभ आणि लवचीक नियमावली आणि दर्जेदार पायाभूत सेवासुविधा यांच्याप्रमाणेच, परकीय कंपन्या तसेच भांडवलास आकर्षित करण्यासाठी त्यांना करविषयक सवलती देणे हेही या चित्रात तर्कदृष्ट्या समाविष्ट होते. कारण, 'सेझ'मध्ये कार्यरत असणाऱ्या उद्योगांनी तयार केलेल्या उत्पादनांची जागतिक बाजारपेठेतील स्पर्धात्मकता ही या सगळ्या खटाटोपातील कळीची बाब होय. 'सेझ'चा अवघा प्रयोगच मुळात जागतिक बाजारपेठेत ठसा उमटविण्यासाठी केलेला असल्याने स्पर्धात्मकता टिकेल-वाढेल अशा सर्व सवलती 'सेझ'मधील उद्योगांना उपलब्ध करून देणे हे आपातत: येतेच.

या अशा विशेष आर्थिक क्षेत्रांचा 'डेमॉन्स्ट्रेशन इफेक्ट' एकंदरच अर्थकारणावर जाणवावा ही अपेक्षा आहे व असते. परकीय भांडवल, गुंतवणूक, उद्योग यांना 'सेझ'मध्ये मुक्त वाव असल्याने भांडवलाच्या आगेमागे परदेशी तंत्रज्ञानाचाही देशी अर्थव्यवस्थेत प्रवेश होतो. परदेशी कंपन्या येताना आपल्याबरोबर आपली कार्यप्रणाली, संकेत, कार्यसंस्कृती घेऊन येतात.या उद्योगांचे व्यवस्थापन, कार्यपद्धती, उत्पादकता यांसारख्या विविध बाबींचे पडसाद आपोआपच मग देशी उद्योगक्षेत्रातही उमटतात. विशेष आर्थिक क्षेत्रातील परदेशी उद्योगांचे देशी कंपन्यांबरोबर जे व्यावसायिक संबंध निर्माण होतात त्यांद्वारे या प्रणाली-संस्कृतींचा देशी अर्थव्यवहारांतही प्रवेश होतो. त्यातून बदलांची प्रक्रिया देशी उद्योगांमध्येही संक्रांत होते. या सगळ्या आदानप्रदानातून देशी उद्योग तसेच उद्योगांची परंपरागत, साचेबंद मानसिकता पालटण्यास गती येते. अर्थव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या एकंदरच वस्तू तसेच सेवांची उत्पादकता आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धात्मकता टिकविण्या-वाढविण्याची प्रवृत्ती या प्रक्रियेद्वारे सार्वत्रिक, सार्वकालिक बनावी, किंबहुना, एकूणच अर्थव्यवहारांचा तो स्थायीभाव बनावा, अशी दीर्घकालीन अपेक्षा असते. त्यामुळे, 'सेझ'च्या स्थापनेची प्रक्रिया आर्थिक सुधारणांच्या कोणत्या टप्प्यावर सुरू होते, हेही महत्त्वाचे ठरते.

नेमके याच ठिकाणी आणि याच बाबतीत चीनचे उदाहरण अभ्यसनीय ठरते. आर्थिक सुधारणांचे ऐलान ३० वर्षांपूर्वी करीत असताना पुनर्रचनेच्या प्रथम चरणातच चीनने 'सेझ'च्या निर्मितीचा नारळ फोडला. १९७९ साली चीनमध्ये प्रथम 'सेझ'ची संकल्पना समूर्त साकारली. पहिले चार 'सेझ' हे आग्नेय चीनच्या किनारपट्टीतील चार लहान शहरांत कार्यरत झाले. 'सेझ'च्या या प्रयोगास चालना देत असताना चीनने डोळ्यासमोर ठेवलेले उद्दिष्ट चौपदरी होते. ही उद्दिष्टे अशी : (१) परकीय भांडवल तसेच परकीय गुंतवणुकीस आवतण देणे, गुंतवणुकयोग्य परकीय भांडवल चिनी अर्थव्यवस्थेत आकर्षित करणे. (२) एकंदरच आर्थिक प्रगतीस चालना मिळण्यासाठी आवश्यक असणारे परकीय चलन मिळविणे. (३) जोरदार आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती साध्य करणे आणि (४) प्रगत तंत्रज्ञान आणि आधुनिक व्यवस्थापन प्रणालींचा चिनी अर्थकारणात तसेच उद्योगविश्वात प्रवेश सुकर करणे. या सर्वांपेक्षाही चीनला सर्वाधिक निकड होती ती आर्थिक विकास तसेच पुनर्रचनेसंबंधीच्या ताज्या टवटवीत दृष्टिकोणाची आणि विचारविश्वाची. खरे म्हणजे आर्थिक विकासाच्या या 'सेझ'सन्मुख 'मॉडेल'कडे चीन बाहेरच्या गतिमान, परिवर्तनशील जगाकडे बघण्याचा, त्या जगाशी संवाद साधण्याचा, त्याच्याशी अर्थपूर्ण संपर्क प्रस्थापित करण्याचा झरोका म्हणूनच बघत होता. माओप्रणित पोलादी चौकटीत चैतन्य आणि नाविन्याचे नवयुग सुरू करणाऱ्या परिवर्तनाच्या झुळुका ज्यामधून चौफेर खेळतील अशा जणू खिडक्या म्हणजे हे 'सेझ'. या प्रयोगाद्वारे चिनी धोरणकर्त्यांच्या मानसिकतेमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आर्थिक सुधारणांच्या प्रथम चरणात नेटाने लावून धरला गेला. परिणामी, 'सेझ'चा हा प्रयोग राबविण्यामागे चीनची भूमिका ही पहिल्यापासूनच निर्यातीस चालना देण्यापेक्षाही परकीय भांडवल, गुंतवणूक आणि प्रगत तंत्रज्ञान आयातीस मुक्तद्वार देण्याची होती.

'सेझ'चा हा प्रयोग चीनमध्ये चांगला रुजण्यास चिनी अर्थव्यवस्थेची काही अंगभूत वैशिष्ट्ये ज्याप्रमाणे बऱ्याच अंशी कारणभूत ठरली, त्याचप्रमाणे 'सेझ'च्या चिनी 'मॉडेल'चे अंतरंगही त्यास पूरकच ठरले. केवळ एवढेच नव्हे तर, हा प्रयोग अंमलात आणताना चिनी धोरणकर्त्यांनी बाळगलेले तारतम्यही त्याची परिणामकारकता वाढविण्यास साहाय्यभूत ठरले. एकतर, आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाची मुहूर्तमेढ रोवत असतानाच 'सेझ'ची संकल्पना वास्तवात उतरविली गेली. सुरुवातीचे 'सेझ' हे

(पृष्ठ ३१ वर पाहावे)

# 'सेझ' कायदा काय सांगतो....?

विशेष आर्थिक क्षेत्रांच्या (स्पेशल इकॉनॉमिक झोन - एसईझेड - 'सेझ' - टिपणात यापुढे सर्वत्र हेच लघुरूप वापरलेले आहे) स्थापनेवरून सध्या तुंबळ रण माजलेले आहे. ही सारी चर्चा 'सेझ'च्या संभाव्य परिणामांभोवती, त्यातून साकारणाऱ्या विकासप्रक्रियेच्या चेहऱ्यामोहऱ्याभोवती एकवटलेली दिसते. परंतु, 'सेझ'निर्मितीसाठी देशाच्या संसदेने जो कायदा मंजूर केला आहे त्या कायद्याचा तपशील, त्यातील तरतुदींचे स्वरूप यांवर मात्र मतामतांच्या या गलबल्यात आवश्यक तेवढा प्रकाशझोत टाकला जात नाही. 'सेझ' कायदा -२००५च्या तरतुदींचा हा गोषवारा, म्हणूनच, या ठिकाणी आवर्जून देत आहोत :-

१. विशेष आर्थिक क्षेत्रांच्या स्थापनेबाबतचे विधेयक लोकसभेमध्ये १० मे २००५ रोजी मांडले गेले. संसदेच्या उभय सभागृहांनी या विधेयकास १२ मे २००५ रोजी मंजुरी दिली. त्या नंतर, २३ जून २००५ रोजी त्यावर राष्ट्रपतींची स्वाक्षरी होऊन विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले. केंद्र सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाने 'सेझ'बाबतचे नियम १० फेब्रुवारी २००६ रोजी अधिसूचित केले आणि त्या दिवसापासून 'सेझ' कायदा, २००५ची अंमलबजावणी सुरू झाली.

२. निर्यातीस चालना देण्यासाठी 'सेझ'ची स्थापना, विकास आणि व्यवस्थापन यांची तरतूद या कायद्यान्वये करण्यात आली आहे.

३. केंद्र सरकार, राज्य सरकार अथवा कोणीही व्यक्ती, या कायद्यांतर्गत, 'सेझ'ची उभारणी एकेकट्याने अथवा संयुक्तपणे करू शकते. 'सेझ'ची उभारणी करण्यास इच्छुक असणारी कोणीही व्यक्ती त्याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारकडे दाखल करू शकते. मात्र, ज्या क्षेत्रावर असे 'सेझ' उभारावयाचे त्या क्षेत्राचे निश्चितीकरण त्या व्यक्तीने असा प्रस्ताव दाखल करण्यापूर्वी केलेले असावयास हवे. 'सेझ' स्थापन करण्याबाबत तयार करण्यात आलेल्या प्रस्तावांची छाननी करून अशा प्रस्तावांना

---

**टीप** - 'सेझ' कायदा, २००५च्या मूळ इंग्रजी संहितेवरून कायद्याचा हा मराठी गोषवारा तयार करताना न्यायमूर्ती पी. बी. सावंत यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

मंजुरी देण्यासाठी केंद्र सरकारने एक 'अनुमती मंडळ' (बोर्ड ऑफ ॲप्रुव्हल), कायद्याची तामिली सुरू झाल्यापासून १५ दिवसांच्या आत अधिसूचनेद्वारे स्थापन करावयाचे आहे. 'सेझ'च्या उभारणीबाबत एखाद्या व्यक्तीने सादर केलेला प्रस्ताव राज्य सरकारने आपल्या शिफारशींसह या अनुमती मंडळाकडे धाडावयाचा आहे. परंतु, त्याच वेळी, असा प्रस्ताव राज्य सरकारऐवजी या अनुमती मंडळाला थेट सादर करण्याचा पर्याय कायद्याने इच्छुक व्यक्तीला खुला ठेवलेला आहे. मात्र, 'सेझ' स्थापन करण्याबाबतची अनुमती संबंधित व्यक्तीस अनुमती मंडळाकडून प्राप्त झाल्यानंतर त्या व्यक्तीने राज्य सरकारचीही सहमती (नेमून दिलेल्या मुदतीत) प्राप्त करणे कायद्याने बंधनकारक आहे.

४. 'सेझ'ची उभारणी राज्य सरकारमार्फतच केली जाणार असेल तर, राज्य सरकारने त्याबाबतचा प्रस्ताव थेट अनुमती मंडळाकडे सादर करावयाचा आहे. मात्र, ज्या जागेवर 'सेझ'ची उभारणी करण्याचा राज्य सरकारचा मानस आहे, त्या जागेचे निश्चितीकरण प्रस्ताव सादर करण्यापूर्वी झालेले असले पाहिजे.

५. खुद्द केंद्र सरकारही, जागेचे निश्चितीकरण झाल्यानंतर, संबंधित राज्य सरकारशी विचारविनिमय करून 'सेझ'ची उभारणी करू शकते. त्याबाबतचा प्रस्ताव अनुमती मंडळास सादर करणे मात्र केंद्रास बंधनकारक नाही.

६. 'सेझ'च्या स्थापनेबाबत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांना अनुमती मंडळाने मंजुरी द्यावयाची आहे. त्या बाबतचे नियम, अटी वा शर्ती या अनुमती मंडळानेच निर्धारित करावयाच्या आहेत.

७. 'सेझ'ची स्थापना करण्यासंदर्भात अनिवार्य असणाऱ्या बाबी या केंद्र सरकारने निश्चित करावयाच्या आहेत. या बाबी पुढीलप्रमाणेः (अ) 'सेझ'साठीच्या जागेचे किमान क्षेत्रफळ तसेच ज्या अटी-शर्तींच्या आधारे 'सेझ'च्या प्रस्तावास अनुमती मंडळाने अनुमती द्यावयाची अथवा तो प्रस्ताव फेटाळावयाचा वा मूळ प्रस्तावात दुरुस्त्या सुचवावयाच्या अशा अटी व शर्ती. असे किमान क्षेत्र किती असावे, याचा निर्देश विशेष आर्थिक क्षेत्र नियम, २००६मध्ये केलेला आहे. तो पुढीलप्रमाणे : (१) बहुजिनसी उत्पादनांसाठी उभारलेले 'सेझ' (मल्टिप्रॉडक्ट सेझ ) : १००० हेक्टर अथवा अधिक क्षेत्राचा सलग भूपट्टा : परंतु, असे 'सेझ' हे खास करून केवळ सेवांच्या निर्मिती व पुरवठ्यासाठीच निर्माण केलेले असेल तर हा सलग भूपट्टा १०० हेक्टर अथवा त्यापेक्षा अधिक आकारमानाचा असावा. (२) उद्योगाच्या एखाद्या विशेष

उपविभागासाठी (स्पेसिफिक सेक्टर)जर 'सेझ' उभारले जात असेल, अथवा, एखाद्या बंदरात वा विमानतळावर जर 'सेझ' आकारास येत असेल तर मात्र त्यासाठी सलग १०० हेक्टर वा त्यापेक्षा अधिक आकारमानाचा भूपट्टा आवश्यक आहे. (आ) 'सेझ'ची उभारणी करणाऱ्या विकासकाचे (डेव्हलपर) हक्क, त्याच्यावर बंधनकारक असणाऱ्या बाबी तसेच त्या विकासकाने जी काही कामे व कार्यवाही करावयाची त्याबाबतच्या अटी व शर्ती. असा विकासक हा एखादी व्यक्ती अथवा राज्य सरकार असू शकेल. 'व्यक्ती' या संकल्पनेत पुढीलपैकी कोणीही असू शकेल : भारतात निवास करणारी अथवा भारताबाहेर निवास असणारी व्यक्ती (मात्र, अशी व्यक्ती ही भारतीय वंशाचीच असली पाहिजे वा कसे हे कायद्यात स्पष्ट केलेले नाही), अविभक्त हिंदू कुटुंब, सहकारी सोसायटी, कंपनी (भारतात वा भारताबाहेर स्थापन झालेली),उद्योग संस्था, खासगी मालकी तत्वावर स्थापन झालेला उद्योग-व्यवसाय, काही व्यक्तींनी एकत्र येऊन तयार केलेली असोसिएशन अथवा गट वा समूह -रीतसर स्थापन केलेला अथवा न केलेला, स्थानिक अधिकार संस्था वा यंत्रणा, यापैकी कोणाच्याही मालकी वा नियंत्रणाखाली असलेले कार्यालय वा त्याची शाखा. 'सेझ' उभारणीबाबत विकासकास अनुमती दिल्याबाबत अनुमती मंडळाने कळविल्यानंतर केंद्र सरकार संबंधित विकासकास 'सेझ' निर्मितीबाबतचे मंजुरी पत्र अदा करील. या पत्राची मुदत तीन वर्षांची असेल. या मुदतीत, मंजूर प्रकल्पाची कार्यवाही करण्यासाठी परिणामकारक पावले उचलणे हे विकासकास बंधनकारक राहील. मात्र, विकासक अथवा सहविकासकाने लेखी विनंती केल्यास या पत्राची मुदत आणखी केवळ दोन वर्षांच्या कालावधीसाठी वाढविण्याचा अधिकार हा अनुमती मंडळास कायद्याने बहाल केलेला आहे.

८. 'सेझ' स्थापन करण्यासाठी ज्या किमान क्षेत्राची आवश्यकता निर्देशित केली जाईल तेवढे क्षेत्र एकाच विकासकापाशी नसेल तर एका 'सेझ'मध्ये एकापेक्षा अधिक विकासकांना केंद्र सरकार मंजुरी देईल.

९. 'सेझ'साठी निर्धारित क्षेत्रात पायाभूत सुविधा पुरविण्यास इच्छुक असणारी व्यक्ती अथवा राज्य सरकार संबंधित विकासकाबरोबर त्याबाबतचा रीतसर करार (ॲग्रिमेन्ट) करील आणि त्यानंतर त्याबाबतचा प्रस्ताव अनुमती मंडळास सादर करील. अनुमती मंडळाची मंजुरी मिळालेली अशी व्यक्ती अथवा राज्य सरकार त्या विविक्षित 'सेझ'साठी 'सहविकासक' (को-डेव्हलपर) म्हणून गणली जाईल. 'सेझ'मध्ये उद्योगव्यवसाय, निवास अथवा मनोरंजनासाठी सेवासुविधा निर्माण करणारी एखादी वेगळी कंपनी तयार

झाल्यास/पुढे आल्यास अशा कंपनीच्या भागभांडवलात विकासक अथवा सहविकासक यांचा किमान २६ टक्के वाटा असणे हे कायद्याने बंधनकारक आहे.

१०. अनुमती पत्र अदा करण्यात आलेला विकासक मग त्या 'सेझ'मधील जागा, अथवा इमारतीचे वाटप मंजुरीप्राप्त उद्योजकांना करील. तसेच अशा उद्योजकांना पायाभूत सेवासुविधाही तोच पुरवील. या उद्योजकांबरोबर हा विकासक त्याबाबतचा रीतसर करारही करील.

११. 'सेझ' स्थापनेबाबतचे संमतीपत्र केंद्र सरकारकडून प्राप्त झाल्यानंतर 'सेझ'साठी निश्चित केलेल्या जागेचे नेमके तपशील केंद्र सरकारला सादर करणे हे विकासकास बंधनकारक आहे. विकासकाने निश्चित केलेल्या जागेचा कब्जा तसेच जागेसंबंधीचे कायदेशीर हक्क त्याच्यापाशी असल्याचा पुरावा त्याने जागेच्या तपशीलासह केंद्र सरकारला सादर करणे हे त्याच्यावर बंधनकारक आहे. तसेच, निश्चित केलेली जागा सर्व प्रकारच्या अडथळ्यांपासून मुक्त असल्याचे राज्य सरकारचे अथवा संबंधित सक्षम अधिकारी यंत्रणेचे प्रमाणपत्रही केंद्रास सादर करणे हे विकासकास अनिवार्य आहे. 'सेझ'साठी निर्धारित केलेली जागा, समजा, विकासकाने भाडेपट्टी तत्वावर घेतली असेल तर अशा भाडेपट्टी कराराची मुदत ही किमान २० वर्षांची असावयास हवी, असे कायदा सांगतो. तसेच, 'सेझ'साठी निश्चित केलेला भूपट्टा हा मोकळा, सलग आणि सार्वजनिक रहदारीचा असता कामा नये. 'सेझ'ची स्थापना करण्याबाबतच्या प्रस्तावाची शिफारस अनुमती मंडळास करीत असताना, 'सेझ'साठीची प्रस्तावित जागा संरक्षित वनक्षेत्रात वा 'पर्यावरणदृष्ट्या नाजूक' या वर्गीकरणात मोडत नाही, असे निर्देशन राज्यसरकारने करावे, अशी तरतूद आहे (मात्र, 'सेझ'साठी निर्धारित केलेले क्षेत्र हे लागवडीयोग्य नसावे, शक्यतो पडीक रानच त्यासाठी निवडावे असे कायद्यात म्हटलेले नाही). 'सेझ'साठीच्या जागेसंबधातील आवश्यक तरतुदींची परिपूर्ती होत असल्याची शहानिशा केल्यानंतर, 'सेझ'साठी विकासकाने निर्धारित केलेले संबंधित राज्यातील ते क्षेत्र केंद्र सरकार 'विशेष आर्थिक क्षेत्र' म्हणून अधिसूचित करील. तसेच, केंद्रास उचित वाटल्यास, मूळ क्षेत्राखेरीज आणखी क्षेत्रही 'सेझ'चा हिस्सा म्हणून पुढील काळात अधिसूचित करता येईल.

१२. एखाद्या राज्यातील, पूर्वापार अस्तित्वात असलेले विशेष आर्थिक क्षेत्रही, 'सेझ'च्या कायद्यातील तरतुदींनुसार स्थापन झाल्याचे अधिसूचित करता येईल, असेही कायद्यात स्पष्ट करण्यात आले आहे.

१३. एखादे क्षेत्र हे 'सेझ' म्हणून अधिसूचित करताना केंद्र सरकार खालील गोष्टींना 'मार्गदर्शक बाबी' म्हणून अधीन राहील :

(अ) आर्थिक व्यवहारांची वाढीव निर्मिती/उलाढाल.

(आ) वस्तू तसेच सेवांच्या निर्यातीस चालना

(इ) देशी तसेच विदेशी स्त्रोतांद्वारे केल्या जाणाऱ्या गुंतवणूकीस बढावा

(ई) रोजगार संधींची निर्मिती

(उ) पायाभूत सेवासुविधांची उभारणी

(ऊ) देशाच्या ऐक्य तसेच सार्वभौमत्वाची जपणूक व रक्षण, राज्यसंस्थेचे संरक्षण व सुरक्षा आणि परकीय सरकारांबरोबर मैत्रीपूर्ण संबंध.

१४. केंद्र सरकारने (वा अन्य एखाद्या सक्षम अधिकारयंत्रणेने) 'सेझ'मध्ये समाविष्ट होणाऱ्या एकंदर क्षेत्राची विभागणी त्याच्या वापरानुसार पुढील तीन विभागांत करावयाची आहे : (अ) वस्तू अथवा सेवांच्या निर्मिती-पुरवठ्याचे काम करणाऱ्या उद्योगांच्या स्थापनेसाठीचे क्षेत्र. या क्षेत्रास 'प्रोसेसिंग एरिया' म्हणून संबोधण्यात येईल, असे कायद्यात नमूद करण्यात आले आहे. (आ) विक्री-व्यापार वा साठवणूक/ वखार स्थापनेसाठी (वेअर हाउसिंग) निर्देशित केलेले क्षेत्र. (इ) वरील दोन गटांत समाविष्ट न होणाऱ्या व्यवहारांसाठीचे क्षेत्र. या क्षेत्रास 'नॉन प्रोसेसिंग एरिया' असे संबोधण्यात येईल. विशेष आर्थिक क्षेत्र नियम, २००६(सुधारित) अनुसार 'सेझ'मधील किमान ३५टक्के क्षेत्र हे 'प्रोसेसिंग एरिया' विकसित करण्यासाठीच निर्देशित केले जाणे आवश्यक आहे. परंतु, अनुमती मंडळाने शिफारस केल्यास हे क्षेत्र २५ टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचे अधिकार केंद्र सरकारला कायद्याने दिलेले आहेत.

१५. 'प्रोसेसिंग एरिया' अथवा 'फ्री ट्रेड ॲन्ड वेअर हाउसिंग एरिया'मधील जागा अथवा बांधकाम हे मान्यताप्राप्त उद्योजकांना केवळ भाडेतत्त्वावरच देण्यात यावे, असा स्पष्ट निर्देश 'सेझ'नियम, २००६ मध्ये करण्यात आलेला आहे. तसेच, या भाडेपट्टी कराराची मुदत आणि त्या उद्योजकास दिलेल्या अनुमती पत्राची मुदत एकच असेल. 'सेझ' स्थापन करण्यासाठी विकासकाने ती जागा भाडेतत्वावरच घेतलेली असली तरी 'सेझ'मध्ये उद्योग स्थापन करणाऱ्या उद्योजकास 'सेझ'मधील भूखंड विकासकाकडून भाडेतत्वावरच दिला जाईल. उद्योग स्थापण्याबाबतचे अनुमती पत्र उद्योजकांना अनुमती समितीकडून अदा झाल्यानंतरच विकासक त्या उद्योजकांबरोबर भाडेपट्टीबाबतचा करार करू शकेल. या भाडेपट्टी कराराची रीतसर नोंदणी होणे गरजेचे

आहे. नोंदणीकृत भाडेपट्टी कराराची एक प्रत विकास आयुक्तांना उद्योजकाने, त्याला अनुमती पत्र अदा झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत सादर करणे बंधनकारक आहे.

१६. 'सेझ'मध्ये कार्यरत असणाऱ्या उद्योगाने अथवा विकासकाने कोणतीही वस्तू अथवा सेवा 'सेझ'मधून निर्यात केली, अथवा 'सेझ'मध्ये आयात केली अथवा 'डोमेस्टिक टॅरिफ एरिया'मधून विकत घेतली ('डोमेस्टिक टॅरिफ एरिया' म्हणजे 'सेझ'च्या हद्दीबाहेरील उभा देश) तर त्यास ज्या कर, शुल्क अथवा उपकरांच्या आकारणीमधून सूट मिळेल अशा करांची सूची कायद्याच्या पहिल्या परिशिष्टात दिलेली आहे. या सूचीमध्ये एकंदर २१ कर, शुल्क तसेच उपकरांचा समावेश केलेला आहे.

१७. 'सेझ' कायद्याची अंमलबजावणी झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जे अनुमती मंडळ स्थापन करणे हे केंद्र सरकारवर कायद्याने बंधनकारक आहे, त्या अनुमती मंडळाची रचना पुढीलप्रमाणे असेल : (अ) केंद्र सरकारच्या वाणिज्य मंत्रालय अथवा विभागातील अतिरिक्त सचिव दर्जाचा अधिकारी हा या मंडळाचा पदसिद्ध अध्यक्ष राहील. (आ) केंद्र सरकारच्या महसूल मंत्रालय अथवा विभागातील संयुक्त सचिव दर्जाचे दोन अधिकारी मंडळाचे पदसिद्ध सदस्य म्हणून केंद्र सरकार नियुक्त करील. (इ) केंद्र सरकारच्या आर्थिक व्यवहार (वित्तीय सेवा) मंत्रालय वा विभागातील संयुक्त सचिव दर्जाचा एक अधिकारी पदसिद्ध सदस्य म्हणून केंद्र सरकार नियुक्त करील. (ई) केंद्र सरकारच्या वाणिज्य, औद्योगिक धोरण व प्रवर्तन, विज्ञान व तंत्रज्ञान, लघु, कृषी प्रक्रिया व ग्रामीण उद्योग, गृह, संरक्षण, पर्यावरण आणि वन, विधी, परदेश व्यवहार आणि नगर विकास या मंत्रालय अथवा विभागांतील संयुक्त सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांची पदसिद्ध सदस्य म्हणून केंद्र सरकार नियुक्ती करील. मात्र, अशा सरकारनियुक्त अधिकाऱ्यांची संख्या १०पेक्षा अधिक असणार नाही.

(उ) ज्या राज्यात 'सेझ'ची उभारणी व्हावयाची आहे त्या राज्य सरकारचा एक प्रतिनिधी पदसिद्ध सदस्य. (ऊ) परकीय व्यापार विभागाचे महासंचालक वा त्यांचा प्रतिनिधी पदसिद्ध सदस्य. (ए) 'सेझ'चे विकास आयुक्त, पदसिद्ध सदस्य. (ऐ) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेन्ट अथवा इंडियन इंन्स्टिट्यूट ऑफ फॉरिन ट्रेड या संस्थांमधील एका प्राध्यापकाची पदसिद्ध सदस्य म्हणून केंद्र सरकारकडून नियुक्ती.

(ओ) 'सेझ'संलग्न बाबींशी संबंधित कामकाज बघणारा केंद्र सरकारच्या वाणिज्य विभाग वा मंत्रालयातील उपसचिव दर्जाचा एक अधिकारी केंद्र सरकारकडून पदसिद्ध सदस्य म्हणून नियुक्त.

यां व्यतिरिक्त, 'सेझ' संबंधित विविध विषयांचे ज्ञान तसेच प्रत्यक्ष कार्यानुभव असणाऱ्या व्यक्तींना स्वीकृत सदस्य म्हणून सहभागी करून घेण्याची संमती अनुमती मंडळास कायद्याने दिलेली आहे. या अनुमती मंडळाच्या जबाबदाऱ्या व कामे पुढीलप्रमाणे असतील : (१) 'सेझ' स्थापन करण्याबाबत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांना मंजुरी देणे, वा प्रसंगी त्यांत सुधारणा सुचविणे अथवा ते प्रस्ताव फेटाळून लावणे. (२) 'सेझ' मध्ये (त्याबाबतचे अधिकार दिलेले) कामकाज करण्याबाबत विकासकास अनुमती देणे. (३) 'सेझ' चा विकास, कामकाज आणि देखभाल यांसाठी थेट परकीय गुंतवणूक तसेच परकीय सहकार्याबाबत विकासक अथवा 'सेझ' मधील उद्योगांना परवानगी देणे. अशी गुंतवणूक करणारी व्यक्ती ही भारताबाहेरील रहिवासीही असू शकते (मात्र, अशी व्यक्ती ही भारतीय वंशाचीच असावयास हवी किंवा कसे याबाबत कायद्यात निर्देश केलेला नाही). (४) 'सेझ' मध्ये पायाभूत सेवासुविधा पुरविण्याबाबत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांना मान्यता देणे वा अशा प्रस्तावांमध्ये दुरुस्त्या सुचविणे वा असे प्रस्ताव नाकारणे. (५) 'सेझ' मध्ये स्थापन होणाऱ्या उद्योगांना परवाना अदा करणे. (६) 'सेझ' च्या उभारणीबाबत विकासकास दिलेल्या अनुमती पत्रास स्थगिती देऊन प्रशासकाची नियुक्ती करणे. (७) अपिले निकालात काढणे. (८) केंद्र सरकारने सोपविलेल्या अन्य कामांची अंमलबजावणी करणे.

१८. 'सेझ' चा विकास आयुक्त (डेव्हलपमेन्ट कमिशनर) म्हणून केंद्र सरकार उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करील. या विकास आयुक्ताच्या अखत्यारीत एक वा एकापेक्षा अधिक 'सेझ' असतील. या विकास आयुक्तास आवश्यक असणारा अधिकारी वर्ग तसेच अन्य कर्मचारी यांचीही नियुक्ती केंद्र सरकारच करील. या विकास आयुक्ताची कामे पुढीलप्रमाणे असतील : (अ) 'सेझ' मध्ये उद्योग स्थापन करण्याबाबत उद्योजकांना मार्गदर्शन करणे. (आ) 'सेझ' मधून होणाऱ्या निर्यातीस परिणामकारक प्रोत्साहन मिळावे यासाठी उचित अशी पावले उचलणे. (इ) वरील दोन्ही बाबी साध्य व्हाव्यात यासाठी केंद्र सरकार वा राज्य सरकारच्या संबंधित विभाग/मंत्रालयांबरोबर सुविहित सुसूत्रीकरण करण्याची/राखण्याची दक्षता घेणे. (ई) 'सेझ' चा विकासक तसेच 'सेझ' मधील उद्योगांच्या कामगिरीवर निगराणी ठेवणे. (उ) केंद्र सरकारने सोपविलेल्या कामांची तामिली करणे. (ऊ) अनुमती मंडळाने सोपविलेल्या कामांची कार्यवाही करणे. 'सेझ' ची एकंदर सूत्रे या विकास आयुक्ताकडे कायद्याने सुपूर्त केलेली आहेत. 'सेझ' चा विकासक तसेच 'सेझ' मध्ये कार्यरत असणारे उद्योग

यांच्या कामकाजावर नजर ठेवण्याच्या दृष्टीने आवश्यक ती माहिती या दोघांकडून वेळोवेळी मागवून घेण्याचा अधिकार या विकास आयुक्तास कायद्याने दिलेला आहे.

१९. 'सेझ' कायद्यांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या 'सेझ'ची उभारणी पूर्ण झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत, 'सिंगल विन्डो क्लिअरन्स'साठी, केंद्र सरकारने प्रत्येक 'सेझ'साठी एक अनुमती समिती (ॲप्रूव्हल कमिटी) स्थापन करावयाची आहे (पूर्वापार अस्तित्वात असलेल्या 'सेझ'च्या बाबतीत अशी अनुमती समिती ही 'सेझ'चा कायदा राबविण्यास प्रारंभ झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत स्थापन करावयाची आहे). या अनुमती समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल : (१) 'सेझ'चे विकास आयुक्त हे या समितीचे पदसिद्ध अध्यक्ष असतील. (२) केंद्र सरकारचे दोन अधिकारी पदसिद्ध सदस्य म्हणून केंद्र सरकार नियुक्त करील. (३) केंद्र सरकारचे दोन अधिकारी महसूल मंत्रालयाचे प्रतिनिधी म्हणून केंद्र सरकार नियुक्त करील. दोघेही पदसिद्ध सदस्य. (४) केंद्र सरकारच्या आर्थिक व्यवहार (वित्तीय सेवा) मंत्रालयाचा प्रतिनिधी म्हणून एक अधिकारी केंद्र सरकार नियुक्त करील. हा अधिकारी पदसिद्ध सदस्य असेल. (५) 'सेझ' ज्या राज्यात आहे तेथील राज्य सरकार आपले दोन अधिकारी पदसिद्ध सदस्य म्हणून नियुक्त करील. (६) विकासकाचा एक प्रतिनिधी 'विशेष निमंत्रित' या नात्याने या समितीमध्ये असेल.

या अनुमती समितीची कामे पुढीलप्रमाणे असतील : (अ) 'सेझ'मध्ये जी कामे करण्याबाबत विकासकास अधिकार देण्यात आले आहेत ती कामे करणे त्याला शक्य व्हावे यासाठी आवश्यक त्या वस्तू 'डोमेस्टिक टॅरिफ एरिया'मधून विकत घेणे अथवा आयात करण्याबाबत विकासकास अनुमती देणे. (आ) 'सेझ'मध्ये जी कामे करण्याबाबत विकासकास अधिकार देण्यात आले आहेत ती कामे करणे त्याला शक्य व्हावे यासाठी त्या सेवा पुरविणाऱ्यांना त्यांबाबतची अनुमती देणे. या सेवा 'डोमेस्टिक टॅरिफ एरिया'मधून अथवा भारताच्या हद्दीबाहेरूनही पुरविलेल्या असतील. (इ) अशा वस्तू वा सेवांचा 'सेझ'मधील वापर/विनियोग तसेच त्यांचा विक्रय-व्यापार वा साठवणूक यांवर नजर ठेवणे. (ई) वस्तू अथवा सेवांची 'सेझ'मध्ये निर्मिती वा साठवणूक वा पुरवठा वा विक्री-व्यापार यासाठी उद्योग स्थापन करण्याबाबत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांना मान्यता देणे, अशा प्रस्तावांत काही सुधारणा सुचविणे वा असे प्रस्ताव नाकारणे. (उ) 'सेझ' कायद्याच्या संबंधित कलमानुसार मान्यता मिळाल्यावर उद्योगस्थापनेसाठी परकीय थेट गुंतवणूक तसेच परकीय सहकार्यास परवानगी

देणे. (ऊ) 'सेझ'मध्ये कामकाज करण्याबाबत अनुमती ज्या अटी-शर्तींच्या आधारे विकासक अथवा उद्योजकास पत्र अदा करण्यात आले आहे त्या अटी-शर्तींशी सुसंगत असे त्यांचे वर्तन आहे किंवा कसे यावर देखरेख करणे. (ए) केंद्र सरकार तसेच संबंधित राज्य सरकार यांच्याकडून वेळोवेळी सोपविण्यात आलेली कामे पार पाडणे.

२०. 'सेझ'मध्ये उद्योग स्थापन करण्यास इच्छुक असणाऱ्या व्यक्तीने त्याबाबतचा प्रस्ताव प्रमाणित नमुन्यात विकास आयुक्तांना सादर करावयाचा आहे. विकास आयुक्त तो प्रस्ताव अनुमती समितीपुढे ठेवतील. अनुमती समिती तो प्रस्ताव जसाच्या तसा वा आवश्यकता वाटल्यास सुधारणांसह स्वीकारेल अथवा फेटाळून लावेल. प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर विकास आयुक्त संबंधित व्यक्तीस 'सेझ'मध्ये उद्योग उभारण्याबाबतचे संमतीपत्र अदा करतील.

२१. हत्यारे व दारुगोळा, स्फोटके, आण्विक पदार्थ, अंमली पदार्थ व घातक रसायने, अल्कोहोलयुक्त पेये व सिगारेट्स यांसारख्या जिनसा वगळता अन्य वस्तूंच्या उत्पादनात गुंतलेल्या 'सेझ'मधील उद्योगांत १०० टक्के परकीय गुंतवणूकीस 'अॅटोमॅटिक रूट' अंतर्गत अनुमती देण्यात आलेली आहे.

२२. 'सेझ'मध्ये 'ऑफशोअर बँकिंग युनिट' सुरू करण्यासाठी इच्छुकास भारतीय रिझर्व्ह बँकेस प्रमाणित नमुन्यात अर्ज सादर करावयास लागेल. असे 'ऑफशोअर बँकिंग युनिट' 'सेझ'मध्ये स्थापन करण्यासंदर्भातील अटी व शर्ती भारतीय रिझर्व्ह बँक अधिसूचित करील.

२३. 'सेझ'मध्ये आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र (इंटरनॅशनल फिनान्शिअल सर्व्हिसेस सेन्टर) स्थापन करण्यास केंद्र सरकार अनुमती देईल. मात्र, एका 'सेझ'मध्ये अशा प्रकारच्या एकाच केंद्रास अनुमती देण्यात येईल. भारतीय रिझर्व्ह बँक, 'सेबी' (सिक्युरिटिज अॅन्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया), 'इर्डा' (इन्शुरन्स रेग्युलेटरी अॅन्ड डेव्हलपमेन्ट अथॉरिटी) यांसारख्या व अन्य संबंधित सक्षम व अधिकारी यंत्रणांनी तयार केलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या अधीन राहून केंद्र सरकार अशा आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्रांच्या उभारणी तसेच कामकाजाबाबत अटी व शर्ती तयार करील.

२४. 'सेझ'चे विकासक तसेच 'सेझ'मध्ये उद्योग स्थापन केलेले उद्योजक पुढील वित्तीय/राजकोषीय सवलती, माफी तसेच परतावा (ड्रॉबॅक) मिळण्यास पात्र/हक्कदार राहतील : (अ) 'सेझ'मध्ये आयात केलेल्या वस्तू अथवा पुरविलेल्या सेवा या सीमाशुल्क कायदा, १९६२ अंतर्गत सीमाशुल्कांच्या आकारणीपासून मुक्त असतील.

'सेझ'मधील उद्योगांवर सीमाशुल्क आकारले जाणार नाही. (आ) 'सेझ'मधून भारताबाहेर कोठेही निर्यात केलेल्या वस्तू अथवा पुरविलेल्या सेवा या सीमाशुल्क कायदा, १९६२ वा सीमाशुल्क कायदा, १९७५ अंतर्गत सीमाशुल्कांच्या आकारणीपासून मुक्त राहतील. 'सेझ'मधील उद्योगांनी केलेल्या निर्यातीवर सीमाशुल्क आकारले जाणार नाही. (इ) 'सेझ'मधील उद्योगांना अबकारी करातून सूट मिळेल. 'डोमेस्टिक टॅरिफ एरिया'मधून 'सेझ'मध्ये आणल्या गेलेल्या वस्तूंवर केंद्रीय अबकारी कर कायदा, १९४४ वा केंद्रीय अबकारी शुल्क कायदा, १९८५ अंतर्गत कोणताही अबकारी कर आकारला जाणार नाही. (ई) 'डोमेस्टिक टॅरिफ एरिया'मधून 'सेझ'मध्ये पुरविल्या गेलेल्या वस्तू अथवा सेवा, अशा वस्तू अथवा सेवा पुरविणारे उद्योग यांना करपरतावा अथवा याच प्रकारचे लाभ मिळतील. असे सेवा पुरविणारे उद्योग हे भारताबाहेरील असले तरी तेही करपरताव्याचा लाभ मिळण्यास पात्र असतील. (उ) 'सेझ'चा विकासक अथवा 'सेझ'मधील उद्योगांना पुरविल्या जाणाऱ्या सेवांवर सेवा कर आकारला जाणार नाही. (ऊ) 'सेझ'मधील आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्राच्या माध्यमातून एखाद्या अनिवासी व्यक्तीने करपात्र रोखे व्यवहार केले तर त्या व्यवहारांवर रोखे व्यवहार कर (सिक्युरिटीज ट्रँझॅक्शन टॅक्स) आकारला जाणार नाही. (ए) 'सेझ'चा विकासक तसेच 'सेझ'मधील उद्योजकांना, त्यांचे कामकाज चालविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंच्या खरेदी-विक्रीस (वृत्तपत्रे वगळता) केंद्रीय विक्री कर कायदा, १९५६ अंतर्गत विक्रीकरातून सूट मिळेल.

२५. 'सेझ'मध्ये नव्याने स्थापन झालेल्या उद्योगघटकांना आयकराबाबत सवलत मिळेल. १ एप्रिल २००६ रोजी वा त्यानंतर सुरू होणाऱ्या कोणत्याही आकारणी वर्षापासून, 'सेझ'मधील उद्योजकाने वस्तू वा सेवांच्या निर्यातीद्वारे मिळविलेला नफा व अन्य लाभ यांवर सलग पाच आकारणी वर्षे संपूर्ण करमाफी मिळेल. त्यानंतर आणखी सलग पाच आकारणी वर्षांसाठी करमाफीचे हे प्रमाण ५० टक्के राहील. 'सेझ'मध्ये उद्योग स्थापन केलेल्या उद्योजकाने 'सेझ पुनर्गुंतवणूक राखीव निधी खाते' तयार करावे असे कायद्यात नमूद केले आहे. उद्योगाने मिळविलेल्या नफ्यापैकी जी रक्कम तो उद्योजक या खात्यामध्ये जमा (वर्ग) करील त्यापैकी निम्मी रक्कम पुढील पाच सलग आकारणी वर्षांसाठी आयकरमुक्त राहील. या खात्यामधील रकमेचा विनियोग कशा प्रकारे होणे अपेक्षित आहे, त्या बाबतही कायद्यात निर्देश आहे. या बाबी पुढीलप्रमाणे : (अ) यंत्रसामग्री वा कारखाना यांचे संपादन. मात्र, ज्या वर्षात

असा राखीव निधी तयार करण्यात आला असेल त्या वर्षापासून तीन वर्षांच्या आत नव्याने संपादन केलेला हा कारखाना वा यंत्रसामग्री वापरात आणली गेली पाहिजे, असे बंधन कायद्याने घातलेले आहे. (आ) संयंत्रे व कारखाना यांचे संपादन होईपर्यंत हा निधी उद्योगव्यवसायाखातर वापरता येईल. मात्र, लाभांश वा नफा या स्वरूपात त्याचे वितरण करणे, भारताबाहेर मालमत्ता खरेदी करणे अथवा भारताबाहेर नफ्याची ती रक्कम पाठविणे (रेमिटन्स ऑफ प्रॉफिट) यांसारख्या स्वरूपांत तिचा विनियोग करता येणार नाही. पूर्वी शहरात अथवा नागरी विभागात असणारा एखादा कारखाना तिथून हलवून 'सेझ'मध्ये नेल्यास अशा उद्योगाची यंत्रसामग्री, जागा, इमारत, जागेवरील हक्क यांसारख्या भांडवली मालमत्तेसंबंधाने जे भांडवली लाभ उद्योजकास अनुभवास येतील ते भांडवली लाभही करमुक्त असतील. 'सेझ'मध्ये कार्यरत असणाऱ्या 'ऑफशोअर बँकिंग युनिट' तसेच आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र यांनाही उद्योग घटकांप्रमाणेच आयकराबाबत सवलती मिळण्याची तरतूद कायद्यात आहे (मात्र, 'सेझ पुनर्गुंतवणूक राखीव निधी खाते' या दोघांनीही तयार करावे किंवा कसे याबाबत कायद्यात काही नमूद केलेले नाही).

२६. प्रत्येक 'सेझ'साठी केंद्र सरकार एक प्राधिकरण (अथॉरिटी) स्थापन करील. त्या बाबतची अधिसूचना सरकारी राजपत्रात रीतसर प्रसिद्ध केली जाईल. या प्राधिकरणाची रचना पुढीलप्रमाणे असेल : (१) प्राधिकरणाच्या अधिकारक्षेत्रातील 'सेझ'चे विकास आयुक्त हे या प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष असतील. (२) 'सेझ'सबंधातील विविध बाबींचा प्रत्यक्षानुभव वा ज्ञान असलेले दोन अधिकारी केंद्र सरकार पदसिद्ध सदस्य म्हणून नियुक्त करील. (३) 'सेझ'संदर्भातील बाबींचे कामकाज हाताळणारा केंद्र सरकारच्या वाणिज्य विभाग अथवा मंत्रालयातील एक अधिकारी केंद्र सरकार पदसिद्ध सदस्य म्हणून नियुक्त करील. (४) दोन उद्योजकांची (अथवा त्यांच्या प्रतिनिधींची) नियुक्ती केंद्र सरकारतर्फे या प्राधिकरणावर पदसिद्ध सदस्य म्हणून केली जाईल. मात्र अशा नियुक्त सदस्यांची संख्या ही दोनपेक्षा अधिक असणार नाही.

आपल्या अखत्यारीतील 'सेझ'चा विकास, कामकाज तसेच व्यवस्थापन यांसाठी आवश्यक असणारी सारी पावले या प्राधिकरणाने उचलावीत असे कायद्याने म्हटले आहे. यांत पुढील बाबींचा अंतर्भाव होतो : (१) 'सेझ'मध्ये पायाभूत सेवासुविधांचा विकास करणे. (२) 'सेझ'मधून निर्यातीस प्रोत्साहन देणे. (३) 'सेझ'च्या कामकाजाचा आढावा घेणे. (४) आपल्या मालकीच्या मालमत्तेचा वापर करू दिल्याबद्दल

संबंधितांकडून सेवा शुल्क, भाडे वा फी वसूल करणे. (५) प्राधिकरणास नेमून दिलेली कामे पार पाडणे.

या प्राधिकरणास केंद्र सरकारकडून अनुदाने वा कर्जाऊ रकमांच्या स्वरूपात निधीचे हस्तांतरण केले जाईल. मात्र त्यासाठी संसदेमध्ये त्याबाबतचा कायदा करावा लागेल. प्रत्येक प्राधिकरणाने त्याच्या अखत्यारीतील 'सेझ'च्या नावाने एक फंड तयार करावा, असे कायदा सांगतो. या फंडामध्ये पुढील रकमा जमा होतील : (अ) संसदेची मंजुरीप्राप्त अशा केंद्र सरकारकडून आलेल्या साऱ्या रकमा. (आ) प्रस्तुत कायद्यानुसार प्राधिकरणास देय असणारी अनुदाने व कर्जाऊ निधी. (इ) प्राधिकरणाच्या मालकीच्या मालमत्तेद्वारे फी वा सेवा शुल्क अथवा भाडेरूपाने मिळालेल्या रकमा. (ई) केंद्र सरकारने ठरवून दिलेल्या अन्य स्त्रोतांकडून मिळालेल्या रकमा.

या फंडात जमा होणाऱ्या साऱ्या निधीचा विनियोग कशासाठी करावयाचा याबाबतही कायद्यात निर्देश आहे. खर्चाच्या या बाबी अशा : (अ) प्राधिकरणाचे सदस्य, अधिकारी व अन्य कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते व इतर मेहेनताना. (आ) प्राधिकरणाच्या कामकाजाखातर करावा लागणारा खर्च. (इ) कर्जाची परतफेड. (ई) प्राधिकरणाचा अन्य प्रशासकीय खर्च.

२७. 'सेझ'मध्ये नोकरी/रोजगार करणाऱ्या, निवासास असणाऱ्या अथवा 'सेझ'च्या क्षेत्रात असणे जिला आवश्यक आहे अशा प्रत्येक व्यक्तीस संबंधित विकास आयुक्तांकडून एक ओळखपत्र अदा करण्यात येईल.

२८. 'सेझ' कायद्यातील अथवा अन्य कोणत्याही केंद्रीय कायद्यातील काही तरतुदी (वा त्या कायद्यांतर्गत केलेले नियम वा जारी केलेले आदेश वा अधिसूचना) एखाद्या विशेष आर्थिक क्षेत्राला अथवा विशेष आर्थिक क्षेत्रांच्या एखाद्या गटाला अथवा सर्व विशेष आर्थिक क्षेत्रांना लागू होणार नाहीत, असा आदेश केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे देऊ शकते. तसेच, 'सेझ' कायद्यातील वा अन्य एखाद्या केंद्रीय कायद्यातील काही तरतुदी वा त्या अंतर्गत केलेले नियम त्यांमध्ये काही अपवाद, सुधारणा करून एखाद्या विशेष आर्थिक क्षेत्राला वा विशेष आर्थिक क्षेत्रांच्या एखाद्या गटाला वा सर्वच विशेष आर्थिक क्षेत्रांना लागू करण्याबाबतची अधिसूचना केंद्र सरकार जारी करू शकते. परंतु, कामगार संघटना, औद्योगिक तसेच कामगारविषयक विवाद, कामगार कल्याण (भविष्यनिर्वाह निधी, कामाच्या ठिकाणची परिस्थिती, मालकाचे दायित्व, कामगारांना देय मोबदला, अपंगत्व तसेच निवृत्तीवेतन, प्रसुतीकाळातील लाभ इत्यादी) यांच्या

संदर्भातील, (विशेष आर्थिक क्षेत्रांना लागू होणाऱ्या) बाबींना मात्र हे कलम लागू होणार नाही.

२९. 'सेझ' कायद्यातील अथवा अन्य कोणत्याही केंद्रीय कायद्यातील काही तरतुदी (वा त्या कायद्यांतर्गत केलेले नियम वा जारी केलेले आदेश वा अधिसूचना) एखाद्या विशेष आर्थिक क्षेत्राला अथवा विशेष आर्थिक क्षेत्रांच्या एखाद्या गटाला अथवा सर्व विशेष आर्थिक क्षेत्रांना लागू होणार नाहीत, असा आदेश देणाऱ्या अधिसूचनेचा मसुदा अधिवेशन काळात संसदेच्या उभय सभागृहांपुढे मांडणे हे कायद्याने केंद्र सरकारवर बंधनकारक आहे. हा मसुदा सभागृहांपुढे एकंदर ३० दिवसांच्या कालावधीसाठी ठेवावयाचा आहे. त्यानंतर संसदेच्या उभय सभागृहांनी सुचविलेल्या सुधारणांचा (सुधारणा सुचविल्या असतील तरच) अंतर्भाव करूनच मग ही अधिसूचना संसदेच्या मंजुरीनंतर केंद्र सरकारला जारी करता येईल.

३०. 'सेझ' कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने, विकासक तसेच 'सेझ'मधील उद्योजकांसाठी राज्य सरकारांनी धोरणे अधिसूचित करावीत, असे कायद्यात नमूद केले आहे. 'सेझ'चे विकासक वा उद्योजक यांना राज्यांमध्ये अस्तित्वात असलेले कर, पट्टी, शुल्क यांच्या आकारणीमधून सूट मिळावी, यांसाठी कायदे करण्याबाबत राज्यांनी उचित पावले उचलावीत असेही हा कायदा म्हणतो.

३१. राज्यात स्थापन होऊ घातलेल्या 'सेझ'बाबत शिफारस करण्यापूर्वी त्या 'सेझ'चा विकासक तसेच तेथील उद्योगांना पुढील गोष्टी उपलब्ध व्हाव्यात यासाठी संबंधित राज्य सरकारने प्रयत्नशील राहावे, असे 'सेझ' नियम, २००६ मध्ये नमूद केलेले आहे : (१) राज्य तसेच स्थानिक पातळीवरील कर, वसुली, शुल्क (मुद्रांक शुल्कासह) तसेच विकासक अथवा 'सेझ'मधील उद्योगांनी खरेदी केलेल्या वस्तूंवर स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत आकारले जाणारे कर यांतून सूट. (२) 'सेझ'च्या 'प्रोसेसिंग एरिया'मध्ये वापरण्यासाठी उद्योगांनी खरेदी केलेल्या विजेसाठीची शुल्कमाफी. तसेच 'सेझ'मधील उद्योगांनी निर्माण केलेल्या विजेच्या विक्रीवरील कर अथवा शुल्काची माफी. (३) वीज कायदा, २००३च्या तरतुदींच्या अधीन राहून 'सेझ'मध्ये विजेची निर्मिती, वितरण तसेच वहन करण्यास अनुमती देणे. (४) विकासकाच्या आवश्यकतेनुसार 'सेझ'मध्ये पाणी, वीज व अन्य सेवा पुरविणे. (५) उद्योगांसंबंधातील औद्योगिक कलह कायदा, १९४७ (No. 14 of 1947) अंतर्गत अधिकारांचे विकास आयुक्तांकडे हस्तांतरण करणे. (६) विकासकाने रोजगार पुरविलेल्या कामगारांसंदर्भात

औद्योगिक कलह कायदा, १९४७(No. 14 of 1947) अंतर्गत असलेल्या अधिकारांचे हस्तांतरण विकास आयुक्तांकडे करणे. (७) 'सेझ'ला औद्योगिक कलह कायदा, १९४७(No. 14 of 1947) अंतर्गत 'पब्लिक युटिलिटी सर्व्हिसेस' म्हणून घोषित करणे. (८) 'सेझ'चे विकासक तसेच 'सेझ'मधील उद्योग यांना राज्य सरकारच्या कायदे तसेच नियमांतर्गत 'एक खिडकी मंजुरी' सवलत/यंत्रणा पुरविणे.

३२. केंद्र सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाच्या संकेतस्थळावर (www.sezindia.nic.in) 'सेझ'संबंधी वारंवार उपस्थित केल्या जाणाऱ्या काही शंका/प्रश्नांना (frequently asked questions - FAQs) उत्तरे दिलेली आढळतात. या प्रश्नांपैकी कामगार कायद्यांच्या संदर्भातील एक प्रश्न आणि त्यास त्या संकेतस्थळावर दिलेले उत्तर हे संदर्भासाठी मुद्दाम जसेच्या तसे या ठिकाणी उद्धृत केले आहे :

Q. Whether SEZs have been exempted from Labour laws ?

Normal Labour Laws are applicable to SEZs, which are enforced by the respective State Governments. The State Governments have been requested to simplify the procedures/returns and for introduction of a single window clearance mechanism by delegating appropriate powers to Development Commissioners of SEZs.

तसेच, 'सेझ' स्थापन करण्यासंदर्भात कोणकोणत्या अटी व शर्ती आहेत, या प्रश्नाला जे उत्तर संकेतस्थळावर दिलेले आहे त्या उत्तरात एकूण सहा पैलू आहेत. त्यापैकी दुसरा पैलू हा 'सेझ'मध्ये स्थानिक कायदे लागू होण्यासंदर्भातील आहे. तो तपशीलही पुढे जसाच्या तसा सादर केला आहे.

Q. Are there any terms & conditions for setting up of SEZ ?

- The SEZ units shall abide by local laws, rules, regulations or bye-laws in regard to area planning, sewerage disposal, pollution control and the like. They shall also comply with industrial and labour laws as may be locally applicable.

## एक विनंती...

वाचकांचा प्रतिसाद हा कोणत्याही लेखन-संपादन व्यवहारातील जितका आनंदाचा तितकाच प्रबोधक भाग असतो. 'अर्थबोधपत्रिके'च्या अंतरंगासंदर्भात समाधान व्यक्त करणारी वाचकांची पत्रे ही उत्साह वाढविणारी अशीच असतात. परंतु त्याच्याच जोडीने, पत्रिकेकडून असणाऱ्या अपेक्षाही शब्दबद्ध करून पत्ररूपाने मांडल्यास अधिक संतोष होईल. -संपादक

*(पृष्ठ १६ वरून)* **'सेझ'ची संकल्पना....**

हाँगकाँग आणि तैवानसारख्या जगविख्यात व्यापारी-व्यावसायिक-औद्योगिक केंद्रांच्या निकट उभारले गेल्याने परकीय भांडवल, तंत्रज्ञान आणि अत्याधुनिक व्यवस्थापन प्रणाली यांच्याशी थेट संपर्क प्रस्थापित करण्यास चीनला त्या मानाने फारसे प्रयास पडले नाहीत. 'सेझ' मध्ये उद्योग स्थापन करू इच्छिणाऱ्या उद्योजकांना भुरळ पाडतील अशा सुविधांची तसेच प्रोत्साहक योजनांची आकर्षक 'पॅकेजेस्', अनिवासी चिनी गुंतवणुकदारांना आश्वासक वाटेल असे मैत्रीपूर्ण गुंतवणूक पर्यावरण व दृष्टिकोण, सीमाशुल्कासंदर्भातील सुटसुटीत कार्यप्रणाली, लवचीक असे कामगारविषयक कायदे ही चीनच्या 'सेझ' विषयक धोरणाची मुख्य वैशिष्ट्ये एकदम 'क्लिक' झाली. चीनची सुदृढ अशी देशांतर्गत बाजारपेठ आणि 'सेझ'च्या व्यवस्थापनासंदर्भात प्रांतिक तसेच पार स्थानिक शासनसंस्थांच्या पातळीपर्यंत अधिकारांचे जाणिवपूर्वक केलेले विकेंद्रीकरण या दोन घटकांनी 'सेझ'च्या चिनी कुळाचे माहात्म्य वाढविले. भारतावर गारुड झाले ते नेमके त्याचेच !

*(पृष्ठ १२ वरून)* **कहाणी विकिपीडियाची...**

जगभरात कौतुकाच्या ठरलेल्या विकिपीडियाला चीनमध्ये मात्र विरोध सहन करावा लागला आहे. चीनमधील नागरिकांना विकिपीडियातील माहिती उपलब्धच होत नाही. माहिती प्रसृत करण्याची ही पद्धतच तेथे मान्य नाही की राजकीयदृष्ट्या संवेदनशील अशा विषयांवर चीनच्या सरकारला आक्षेप असावा, हे मात्र जिमी वेल्स यांना न उलगडलेले कोडे आहे. तथापि विकिपीडियाचे चाळणी लावलेले 'व्हर्शन' त्यांना मान्य होणारे नाही. असा ऑनलाइन मजकूर संपादित करीत असताना एखादी व्यक्ती त्रासदायक ठरू लागल्यास इतर सर्व जण चर्चा करून तिच्यावर बंधने घालतात. विकिपीडियातील सर्वच भाषांमधील मजकूर लिहिताना असे घडत असते. असे करणे त्या वेळी गरजेचे ठरत असले तरी ती त्यांच्या मनाला क्लेशदायक बाब ठरते. विकिपीडियाच्या अरबी भाषेतील मजकूराबाबत सध्या असे घडत आहे.

जगभरात प्रसिद्धी मिळविलेले जिमी वेल्स हे संगणकशास्त्रज्ञ नाहीत. फायनान्स या विषयात डॉक्टरेट प्राप्त केल्यानंतर त्यांनी १९९४ ते २००० या काळात याच क्षेत्रात नोकरी केली. त्यानंतर इंटरनेटचे जाळे व व्यवसाय विस्तारू लागताच त्यांनी या प्रांतात उडी घेण्याचे ठरविले. हा त्यांचा कालोचित निर्णय केवळ त्यांनाच नव्हे तर जगाला अतिशय उपयुक्त ठरला आहे, याबद्दल दुमत नसावे.

# 'सेझ' आणि 'सार्वजनिक हित' यांचा संबंध 'रीमोट'

विशेष आर्थिक क्षेत्रांच्या (स्पेशल इकॉनॉमिक झोन - एसईझेड - 'सेझ' - लेखनात यापुढे सर्वत्र हेच लघुरूप वापरलेले आहे) स्थापनेबाबतचे विधेयक लोकसभेमध्ये १० मे २००५ रोजी मांडले गेले. संसदेच्या उभय सभागृहांनी या विधेयकास १२ मे २००५ रोजी मंजुरी दिली. देशाचे शेती क्षेत्र आणि शेतीवर उपजीविका अवलंबून असणाऱ्यांचे भवितव्य, एकंदरच ग्रामीण विभाग, जमिनीचा वापर, रोजगार निर्मिती, देशातील नागरीकरण आणि त्याच्या वाढविस्ताराचा वेग यांसारख्या अर्थ तसेच समाजकारणाच्या विविध अंगांवर दूरगामी परिणाम घडवून आणण्याची क्षमता असणाऱ्या या विधेयकावर खरे म्हणजे संसदेच्या उभय सभागृहांत सविस्तर अशी साधकबाधक चर्चा होणे अपेक्षित होते. मात्र, विधेयक सादर झाल्यापासून केवळ दोनच दिवसांत संसदेच्या उभय सभागृहांनी त्यावर संमतीची मोहोर उमटविली, ही खरोखर सर्वच लोकशाहीप्रेमी संवेदनशील नागरिकांना अंतर्मुख होण्यास भाग पाडणारी आणि तितकीच चिंतनीय अशी बाब आहे. 'सेझ'च्या या मुद्यावरून सध्या देशभरात सर्वत्र हलचल माजलेली दिसते. उपलब्ध माहितीनुसार, 'सेझ'च्या स्थापनेसाठी देशभरात सुमारे ४००च्या आसपास प्रस्ताव दाखल झाले असून त्यांपैकी ३००च्या आसपास प्रस्तावांना मान्यता मिळाल्याचे कळते. 'सेझ'विरुद्ध जो असंतोष ठिकठिकाणी दृग्गोचर होतो आहे तो मुख्यतः 'सेझ'साठी केल्या जात असलेल्या (वा कराव्या लागणाऱ्या) भूसंपादनाशी निगडीत आहे. त्यामुळे, भूसंपादनाशी संलग्न ज्या विविध तरतुदी 'सेझ'च्या कायद्यात आहेत, त्यांचा आपण या ठिकाणी तपशीलवार प्रथम विचार करू.

---

*__'सेझ' कायदा आणि त्याचा अर्थ__ या विषयावर भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीमध्ये २८ जानेवारी २००७ रोजी एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ विधिज्ञ आणि सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त __न्यायमूर्ती पी. बी. सावंत__ यांचे या चर्चासत्रात मुख्य भाषण झाले. 'सेझ' कायद्याच्या विविध तरतुदींचे अंतरंग उकलून दाखवत त्यातील खाचाखोचा उलगडून दाखवणाऱ्या न्यायमूर्ती सावंत यांच्या विवेचनाचा हा सारांश.*

कायद्यातील तरतुदीनुसार, केंद्र सरकार, राज्य सरकार वा एखादी व्यक्ती ही एकेकटी अथवा उर्वरित दोन घटकांसह संयुक्तपणे 'सेझ'ची स्थापना करू शकते. 'सेझ'च्या प्रकारानुसार त्यासाठी किमान किती क्षेत्राची आवश्यकता आहे, याबद्दल 'सेझ'बाबतच्या नियमांत निर्देश आहेत. परंतु, तसेच निर्देश कमाल क्षेत्राबाबत मात्र नाहीत. एखाद्या 'सेझ'चे कमाल क्षेत्र वा कमाल आकारमान जास्तीतजास्त किती असावे, याबाबत काहीही मर्यादाच नाही. केवळ इतकेच नाही तर, देशभरात असे 'सेझ' जास्तीतजास्त किती असावेत, याहीबद्दल कायद्यात काहीही म्हटलेले नाही. हे 'सेझ' पुढीलपैकी कोणत्याही एका कारणासाठी स्थापन करण्याची तरतूद कायद्यात आहे - (१) वस्तूंचे उत्पादन (२) सेवांची निर्मिती (३) वस्तू अथवा सेवांची निर्मिती (४) मुक्त व्यापार व साठवणूक क्षेत्र म्हणून (फ्री ट्रेड अॅन्ड वेअरहाउसिंग एरिया). 'सेझ'मध्ये निर्माण केल्या जाणाऱ्या वस्तू अगर सेवा या निर्यातीसाठीच अथवा निर्यातप्रधान असल्या पाहिजेत, असा स्पष्ट निर्देश या ठिकाणी नाही, ही बाब लक्षणीय आहे. 'सेझ'च्या स्वरूपानुसार त्यासाठी किमान किती क्षेत्राची तरतूद करणे आवश्यक आहे, याबाबत 'सेझ'च्या नियमांत स्पष्ट निर्देश करण्यात आले आहेत. मात्र, मजा म्हणजे, 'सेझ'च्या स्थापनेसाठी प्रस्ताव दाखल करीत असताना उपरोक्त चार पर्यायांपैकी नेमक्या कोणत्या हेतूने तो विशिष्ट 'सेझ' स्थापन करण्यात येत आहे, हे स्पष्टपणे प्रस्तावात नमूद करणे हे मात्र विकासकावर कायद्याने बंधनकारक नाही.

या सगळ्यात आणखीही एक मौज आहेच. केंद्र अथवा राज्य सरकार वा एखादी व्यक्ती जेव्हा विकासक या नात्याने 'सेझ'च्या स्थापनेसाठीचा प्रस्ताव अनुमती मंडळास सादर करते त्या वेळी ज्या क्षेत्रावर त्या 'सेझ'ची उभारणी करण्यात यावयाची, ते क्षेत्र त्या विकासकाच्या ताब्यात असलेच पाहिजे, असे बंधनही 'सेझ'चा कायदा कोठेही घालत नाही. कायद्यातील विद्यमान तरतुदीनुसार विकासकाने त्या क्षेत्राचे केवळ निश्चितीकरण करणे अपेक्षित आहे. मात्र, 'सेझ'ची स्थापना करण्यासाठी ज्या किमान क्षेत्राची आवश्यकता निर्देशित केलेली असेल तेवढे क्षेत्र एकाच विकासकाच्या ताब्यात नसेल तर एका 'सेझ'मध्ये एकापेक्षा अधिक विकासकांना केंद्र सरकार मंजुरी देईल, असे पुन्हा कायदाच सांगतो. म्हणजे, 'सेझ'च्या प्रस्तावास मंजुरी देताना त्या विकासकाच्या ताब्यात जमीन आहे किंवा नाही, असेल तर किती आहे या कशाचीही छाननी सरकार करणार नाही. मात्र, 'सेझ'च्या स्थापनेसाठी आवश्यक असणारी किमान जमीन विकासकापाशी नसेल तर मात्र एकापेक्षा अधिक विकासकांना सरकार एका 'सेझ'मध्ये

मंजुरी देणार ! याचा अर्थ हा की एका पातळीवर जागेचे केवळ निश्चितीकरण पुरेसे ठरते तर, दुसऱ्या ठिकाणी ती जागा प्रत्यक्ष ताब्यात असणे अनिवार्य ठरते. केवळ इतकेच नाही तर, 'सेझ'च्या प्रकारानुसार त्याच्या किमान क्षेत्राबाबतच्या ज्या तरतुदी नियमांत करण्यात आलेल्या आहेत त्यापैकी किमान किती क्षेत्र हे विकासकापाशी प्रस्ताव दाखल करतेवेळीच असले पाहिजे (निश्चितीकरणाच्या स्वरूपात अथवा जागेच्या प्रत्यक्ष कब्जाच्या स्वरूपात) यांबाबतही कायदा काही बंधन घालत नाही. 'सेझ'साठीच्या प्रस्तावित जागेसाठीचे निश्चितीकरण त्या विकासकाने केले आहे म्हणजे नेमके काय केले आहे अथवा नेमके काय करणे अपेक्षित आहे, याबाबतही हा कायदा काही बोलत नाही. खरे पाहता, 'सेझ'च्या स्थापनेसाठी प्रस्ताव सादर करतेवेळीच आवश्यक तेवढी जमीन (अथवा काही किमान जमीन) ही विकासकाच्या ताब्यात असली पाहिजे, असे बंधन कायद्याने घालणे आवश्यक होते. कारण, 'जागेचे निश्चितीकरण' ही अतिशय ढोबळ आणि ढिसाळ संज्ञा/संकल्पना आहे.

'सेझ'च्या स्थापनेसाठी भूसंपादन नेमके कसे करावयाचे, याबाबत कायद्यात काहीही म्हटलेले नाही. या संदर्भात 'सेझ'चा कायदा संपूर्ण मौनच धारण करतो. भूसंपादनासंदर्भात कायद्यात काहीच निर्देश नसताना दुसरीकडे राज्य सरकार मात्र भूसंपादन कायद्यातील तरतुदींचा अवलंब करून काही खासगी कंपन्यांच्या प्रस्तावित 'सेझ'साठी जमीन संपादनाच्या नोटिसा काढत असल्याचे चित्र दिसते आहे. इथेही पुन्हा मजा बघा. भूसंपादनाबाबत शासनाने काढलेल्या या नोटिसांमध्ये हे भूसंपादन कोणासाठी व कशासाठी केले जाते आहे, याचा कोठे निर्देशच नाही, असे सध्या उपलब्ध असलेल्या माहितीवरून समजते. भूसंपादन कायद्यातील तरतुदींनुसार सार्वजनिक हेतूच्या पूर्ततेसाठी सरकार जमीनधारकांकडून सक्तीने जमीन संपादन करू शकते. परंतु, मग 'सेझ'ची निर्मिती हा सार्वजनिक हेतू होऊ शकतो का, हा प्रश्न इथे उपस्थित होतो. समजा, धरणासाठी वा तत्सम एखाद्या अन्य विकासकामासाठी सरकारने भूसंपादन कायद्यान्वये जमीन संपादन केली आणि त्या प्रकल्पाची वा उपक्रमाची उभारणी सुरू झाली तर, तो प्रकल्प वा उपक्रमासाठी करण्यात आलेले भूसंपादन आणि त्याद्वारे सार्वजनिक हेतूची होणारी पूर्तता यांमधील नातेसंबंध हा साक्षात आणि थेट असतो. कारण, प्रकल्पासाठी भूसंपादन करणारी यंत्रणाच त्या प्रकल्पाच्या उभारणीचे उत्तरदायित्व स्वीकारत असते व त्याप्रमाणे त्याची कार्यवाहीही करते. 'सेझ'च्या बाबतीत मात्र असे घडताना दिसत नाही. याचे कारण असे की 'सेझ'च्या निर्मितीसाठी प्रस्ताव सादर

करणारा विकासक हा मुळात केवळ जमीन संपादन करणारा वा संपादित जमिनीवर उद्योजकांना आवश्यक असणाऱ्या पायाभूत सेवासुविधा पुरविणारा असतो. पुन्हा, या पायाभूत सेवाही तोच पुरवील याचीही शाश्वती नाही. कारण त्यासाठी एकाद्या दुसऱ्या व्यक्तीला वा यंत्रणेला सहविकासक म्हणून 'सेझ'च्या निर्मितीमध्ये सहभागी करून घेण्याची मुभा विकासकास कायद्याने दिलेली आहे. 'सेझ'साठी जो विकासक प्रस्ताव सादर करील त्यानेच (१) वस्तूंची, अथवा (२) सेवांची, अथवा (३) वस्तू व सेवांची, वा (४) मुक्त व्यापार व साठवणूक क्षेत्राची निर्मिती केली पाहिजे, असे बंधन त्याच्यावर कायद्याने नाही. विकासक हा त्याने प्रस्ताव सादर केलेल्या 'सेझ'मध्ये उद्योजकांना वरील बाबींसाठी भाडेतत्त्वावर केवळ जमीन उपलब्ध करून देणार. बरे, जे उद्योजक 'सेझ'मध्ये उद्योग स्थापन करणार त्यांनीही निव्वळ निर्यातीसाठीच अथवा निर्यातप्रधान वस्तू व सेवांची निर्मिती केली पाहिजे, असे बंधन कायदा त्यांच्यावर घालत नाही. 'सेझ'च्या क्षेत्रात ज्या काही पायाभूत सेवासुविधा पुरविण्यात येणार त्यांचा लाभ हा त्या क्षेत्रातील उद्योगव्यवसाय व व्यावसायिकांनाच काय तो मिळणार. वरकड जनसामान्यांना त्या सुविधांचा यत्किंचितही फायदा नाही, कारण कायद्यातील तरतुदीनुसार 'सेझ'च्या क्षेत्रात प्रवेश करण्यासाठीही ओळखपत्राची आवश्यकता आहे. परिणामी, 'सेझ'ची निर्मिती हा सार्वजनिक हेतू असल्याचे गृहीतक मांडून राज्य सरकारे भूसंपादन कायद्याखाली जमिनी संपादित करीत असतील तर 'सेझ' आणि 'सार्वजनिक हेतू' या उभयतांमधील संबंध हा 'थेट' नसून 'रीमोट' असा आहे, हे या ठिकाणी आपण सर्वांनी ध्यानात घेण्याची गरज आहे. त्यामुळे, भूसंपादन कायद्याचा वापर करून एखाद्या खासगी विकासकासाठी जमिनी संपादन करण्याच्या नोटिसा काढणे - आणि तेही पुन्हा त्या कोणासाठी व कशासाठी संपादन करण्यात येत आहेत याचा स्पष्ट निर्देश नोटिशीत न करता, 'सेझ'ची निर्मिती आणि सार्वजनिक हेतू या उभयतांमधील संबंध हा 'थेट' नसून 'रीमोट' अशा प्रकारचा असताना - हेच मुळात बेकायदेशीर ठरते.

या ठिकाणी आणखीही एका मुद्याचा परामर्ष घेणे आवश्यक आहे. सार्वजनिक हेतूसाठी म्हणून जेव्हा सरकार जमीन संपादन करते तेव्हा संपादन केलेल्या जमिनीचा वापर नेमका केव्हा केला जातो, हेही महत्त्वाचे ठरते. 'सिडको'चे उदाहरण या संदर्भात कमालीचे बोलके आहे. औद्योगिक विकासासाठी 'सिडको'ने १९७२ साली नवी मुंबई परिसरात भूसंपादन केले होते. संपादित जमिनीपैकी काही जमीनच औद्योगिक कारणांसाठी

वापरली गेली. बरीचशी जमीन 'सिडको'पाशी तशीच पडून राहिली. आता त्याच संपादित जमिनीवर 'सिडको' नव्याने 'सेझ'च्या उभारणीचा घाट घालीत आहे. म्हणजे, भूसंपादन केल्यानंतर जवळपास ३५ वर्षे ती जमीन विनावापरच पडून होती.

'सेझ'च्या बाबतीतही हाच पैलू थोड्या वेगळ्या अंगाने डोकावतो. 'सेझ'च्या स्थापनेसाठी विकासकास अदा करण्यात आलेल्या अनुमती पत्राची मुदत ही तीन वर्षांची असते. त्याहीपुढे ही मुदत जास्तीतजास्त दोन वर्षांसाठी वाढविण्याची तरतूद कायद्यात आहे. या पहिल्या तीन वर्षांच्या मुदतीत, विकासकाने 'सेझ'च्या निर्मितीच्या दिशेने ठोस पावले उचलणे अपेक्षित आहे. कायद्याद्वारे सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्यांचे पालन करण्यास विकासक असमर्थ ठरत असल्याचे अथवा अनुमती मंडळाने दिलेल्या आदेशांचे पालन करण्याबाबत विकासकाकडून कुचराई होत असल्याचे अनुमती मंडळाच्या निदर्शनास आले तर त्या विकासकाचे अनुमती पत्र एक वर्षाच्या कालावधीसाठी निलंबित ठेवण्याची तरतूद 'सेझ'च्या कायद्यात करण्यात आली आहे. या वर्षभराच्या कालावधीत त्या 'सेझ'वर प्रशासकाची नियुक्ती करण्यात येईल. त्यानंतर, मूळ विकासकास अदा करण्यात आलेले अनुमती पत्र हे दुसऱ्या, नवीन विकासकाकडे (एक वा अनेक) हस्तांतरित करण्यासाठी अनुमती मंडळ इच्छुकांकडून अर्ज मागवून घेईल. अनुमती मंडळाने नवीन विकासकाची निवड केल्यानंतर त्या 'सेझ'साठी मूळ विकासकास दिलेले हक्क, अनुमती पत्र इत्यादी दस्तऐवज मूळ विकासकाने नवीन विकासकाकडे सुपूर्त करावेत, असे कायदा सांगतो. हे हस्तांतरण कोणत्या अटीशर्तींनुसार व्हावे हेही पुन्हा त्या 'सेझ'चा मूळ विकासक व नवीन विकासक यांनी परस्परसंमतीनेच ठरवावयाचे आहे. आता हे हस्तांतरण ज्या अटीशर्तींच्या आधारे व्हावयाचे त्यांबाबत कोणत्याही प्रकारची मार्गदर्शक तत्वे 'सेझ'च्या कायद्यात नमूद करण्यात आलेली नाहीत. म्हणजे, एखाद्या विकासकाने ज्या किमतीला 'सेझ'साठी जमीन विकत/खंडाने घेतली असेल त्यापेक्षा कितीतरी अधिक किमतीला/खंडाने त्याने ती जमीन नवीन विकासकाकडे हस्तांतरित केली तर त्याबाबत सरकार काय भूमिका घेणार, या संपूर्ण व्यवहारात सरकारला काय लाभ होणार, यांसारखे प्रश्न अनुत्तरितच राहतात. मुळात, जमीनधारकांकडून संपादन केलेली जमीन काही काळपर्यंत विनावापर पडून राहणे हे तरी कितपत समर्थनीय आहे 'सिडको'ने तर जमिनीचा ताबा तब्बल ३०-३५वर्षे घेऊ न ठेवला होता. याच्याशी संलग्नच परंतु आणखी एक कळीचा मुद्दा हा की एखाद्या विकासकाने 'सेझ'च्या स्थापनेसाठी जमीन संपादन केली आणि त्या 'सेझ'मध्ये उद्योग

स्थापनेसाठी समजा उद्योजक पुढेच आले नाहीत तर ? अशा (अगदी टोकाच्या परिस्थितीत) मग त्या संपादित जमिनीचा वापर नेमका कशासाठी होणार अथवा कशासाठी, कशाप्रकारे करावा यांबाबतही 'सेझ'चा कायदा काहीही बोलत नाही. ज्या विकासकाने ती जमीन विकत अथवा खंडाने घेतलेली आहे तो विकासक त्या जमिनीचा भोगवटा अन्य कोणालाही कोणत्याही कारणासाठी करून देणार नाही, हे साहजिकच आहे. अशा परिस्थितीत त्या जमिनींचे भवितव्य काय असणार आहे ? 'सेझ'मधील किमान ३५ टक्के जमीन ही 'प्रोसेसिंग एरिया' म्हणून वापरली जावी, असे कायद्यात बंधन आहे. समजा, हे ३५ टक्के क्षेत्र पुरेपूर वापरले जाईल इतके वस्तू वा सेवानिर्मिती उद्योग एखाद्या 'सेझ'मध्ये पुढे आलेच नाहीत, तर मग अशा अवशिष्ट जमिनीचा वापर तो विकासक कशा प्रकारे करेल, अथवा त्याने त्या क्षेत्राचा वापर कशा प्रकारे करावा, यांबद्दलही कायद्यात काही मार्गदर्शक तत्वे नाहीत. 'सेझ'ची निर्मिती आणि 'सार्वजनिक हेतू' या दोहोंमधील संबंध थेट नसून 'रीमोट' आहे, या वास्तवाचेच हे आणखी एक परिमाण. त्याहीपुढे जाऊन, एकंदर 'सेझ'मधील किमान ३५ टक्के जमीन 'प्रोसेसिंग एरिया' म्हणून वापरली जावी, असे कायदाच सांगतो हेही लक्षणीयच. हे एवढेच प्रमाण 'प्रोसेसिंग एरिया'साठी काय म्हणून ? ते अधिक का नसावे ?

'सेझ'च्या स्थापनेसाठी भूसंपादन करीत असताना कशा प्रकारची जमीन संपादन करावी, यांबाबतही 'सेझ'च्या कायद्यात काही निर्देश नाही. भूसंपादन कायद्याच्या तरतुदी जारी करून त्या अंतर्गत जेव्हा जमिनी सरकार ताब्यात घेते तेव्हा सर्वसाधारणपणे एक संकेत असा पाळला जातो की, शक्यतो लागवडीयोग्य, वैतीखालील जमिनी संपादन केल्या जात नाहीत. लागवडयोग्य नसलेल्या, पडीक, वरकस जमिनीच सरकार ताब्यात घेते. उपलब्ध बातम्यांवरून जाणवते की 'सेझ'च्या स्थापनेसाठी जे भूसंपादन सध्या सुरू आहे, त्या संपादनादरम्यान मात्र हा तरतम भाव बाळगला जात असल्याचे दिसत नाही. त्यापायी लागवडीखालील, अगदी दुबार-तिबार पिके देणाऱ्या जमिनीही धोक्यात येत आहेत. 'सेझ'च्या स्थापनेस तसेच या संकल्पनेस आज जो सार्वत्रिक विरोध होताना दिसतो त्यामागील एक महत्त्वाचे कारण हेच आहे.

मुळात, 'सेझ'च्या स्थापनेसाठी भूसंपादन कायद्यातील तरतुदी लागू करून सरकार जे भूसंपादन करीत आहे तेच कायद्याच्या दृष्टीने कितपत वैध आहे, असा मूलभूत कळीचा मुद्दा उपस्थित होतो. भूसंपादन कायद्यातील कलम ४४(ब) अनुसार, कर्मचाऱ्यांच्या निवासाखातर करावयाच्या बांधकामाव्यतिरिक्त कोणत्याही अन्य

कारणासाठी सरकार खासगी कंपन्यांखातर या कायद्यान्वये भूसंपादन करू शकत नाही. मूळ भूसंपादन कायद्यातील या ४४(ब) कलमात आजवर कोणत्याही प्रकारची सुधारणा वा दुरुस्ती करण्यात आलेली नाही. या कायद्याचा अवलंब करून आज सरकार शेतकऱ्यांच्या ज्या जमिनी काढून घेत आहे त्या जमिनी सरकार 'सेझ'च्या स्थापनेसाठी खासगी विकासकांच्या सुपूर्त करणार. हा विकासक परत त्या जमिनीत भूखंड पाडून ते खासगी उद्योजकांना भाडेतत्त्वावर देणार. म्हणजे, पर्यायाने भूसंपादन कायद्यांतर्गत संपादन केलेल्या जमिनी या खासगी उद्योजकांना उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. ही सगळी कार्यप्रणालीच भूसंपादन कायद्यातील तरतुदींशी विसंगत अशी आहे. मग, सरकार भूसंपादन कायदा जारी करून जमिनी कशाच्या आधारे संपादन करीत आहे ? बरे, विकासक ही जी जमीन खासगी उद्योगांना भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देणार त्या भाडेपट्टीबाबत 'सेझ'च्या कायद्यात काहीही मार्गदर्शक तत्त्वे नाहीत. विकासकाने ही भाडेपट्टी कशी ठरवावी, किती ठरवावी, कोणत्या निकषांच्या आधारे ठरवावी, ज्या उद्योजकांना उद्योग स्थापनेसाठी 'सेझ'मधील भूखंड उपलब्ध करून द्यावयाचे ते उद्योजक कसे निवडावेत, या निवडीचे निकष कोणते असावेत, कोणाला जमीन ('सेझ'मधील) द्यावी, यां कशाहीबद्दल कायद्यात काहीही मार्गदर्शक तत्वे आढळून येत नाहीत. विकासकाने खासगी उद्योजकांवर आकारावयाच्या भाडेपट्टीवर कायद्याने कोणतीही कमाल मर्यादा घातलेली नाही.

'सेझ'च्या स्थापनेमुळे देशांतर्गत उद्योगक्षेत्रात 'सेझ'मधील उद्योग आणि 'सेझ'बाहेरील उद्योग असे एक नवीनच द्वैत उभे ठाकणार आहे. 'सेझ'मधील उद्योगांना विविध प्रकारच्या करविषयक सवलती मिळणार असल्याने साहजिकच त्यांची स्पर्धात्मकता ही देशभरात अन्यत्र कार्यरत असणाऱ्या उद्योगांपेक्षा अधिक असणार आहे. त्यामुळे, बाजारपेठीय स्पर्धेत - देशांतर्गत अथवा आंतरराष्ट्रीय - या उद्योगांसमोर टिकाव लागू न शकणारे असे 'सेझ'बाहेरील उद्योग साहजिकच त्यांचे पुनर्स्थानांकन (रीलोकेशन) 'सेझ'मध्ये घडवून आणण्याच्या मागे लागतील. यातून, उद्योगव्यवसायांच्या विस्तार तसेच स्थापनेत मुळातच पोसला गेलेला क्षेत्रीय अथवा विभागीय असमतोल अधिकच परिपुष्ट होण्याचा धोका संभवतो. त्यातून, प्रादेशिक विषमतेपायी आज ज्या समस्या उद्भवलेल्या दिसतात त्यांचे स्वरूप अधिकच संघन होण्याच्या शक्यता वाढाव्यात हे मग ओघानेच येते. मुळात, निर्यात वाढावी, निर्यातीस प्रोत्साहन वाढून जागतिक बाजारपेठेतील भारताचा शेर वाढावा हाच जर हेतू असेल तर त्यासाठी 'सेझ'सारख्या

वेगळ्या भूभागाची निर्मिती ही अनिवार्यच आहे का, या पैलूचाही मुळातूनच विचार होणे गरजेचे आहे. 'सेझ'मधील उद्योगांना करविषयक ज्या सवलती मिळणार त्याच सवलती देशभरात कोठेही कार्यरत असणाऱ्या परंतु निर्यातप्रधान उद्योगांनाच सरकारने का देऊ नयेत ?

'सेझ'च्या या संकल्पनेचा अवलंब केल्याने या 'सेझ'केंद्रित विकासाचा देशातील रोजगाराच्या चित्रावर नेमका काय परिणाम होईल, या मुद्याचाही परामर्ष घ्यावयास हवा. 'सेझ'मध्ये कामगारविषयक कायदे लागू होतील (त्या त्या राज्यात अस्तित्वात असलेले) असे 'सेझ'कायदा सांगतो. व्यवहारात मात्र ही कायदेशीर तरतूद केवळ कागदोपत्रींच अस्तित्वात राहण्याची चिन्हे आहेत. याचे कारण असे की, मुळात 'सेझ'मधील उद्योग हे निर्यातप्रधान व निर्यातोन्मुख असे असणार (निदान तसे अपेक्षित तरी आहे). परिणामी, आपल्या मालाची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धात्मकता कायम अव्वल दर्जाची राखणे हे त्यांच्या लेखी त्यांचे आद्य उद्दिष्ट असावे, यांत काहीच नवल नाही. वस्तू अथवा सेवांचा उत्पादन खर्च जेवढा मर्यादित ठेवावा तेवढी त्यांची किंमत स्पर्धात्मक राहते. त्यामुळे, उत्पादन खर्चात बचत करण्यासाठी 'सेझ'मधील उद्योगांनी कामगारबचत करणारे, भांडवलसघन तंत्रज्ञानच जर अंगीकारले तर ते अत्यंत स्वाभाविकच ठरते. म्हणजे, मुळातच 'सेझ'मधील उद्योगांमधून रोजगारवाढीस मोठ्या प्रमाणावर चालना मिळण्याच्या शक्यता धूसरच दिसतात. त्यातही पुन्हा, या उद्योगांनी जी काही नोकर वा कर्मचारी भरती करावयाची ती केवळ कंत्राटी तत्त्वावरच करावयाची असा खाक्या अवलंबला तर मग 'सेझ'मध्ये कामगार कायदे लागू होतात किंवा नाही, हा मुद्दाच मुदलात गैरलागू ठरतो. कारण, कामगारविषयक कोणतेही कायदे हे कंत्राटी कामगारांना मुळात लागूच होत नाहीत ! त्यामुळे, 'सेझ'मधील उद्योगांना कामगारविषयक कायदे लागू होतील, या तरतुदीला व्यवहारात फारसा अर्थच नाही. 'सेझ'च्या संकल्पनेस विरोध केल्याने आपण किती मोठ्या प्रमाणावरील रोजगार संधींच्या निर्मितीस मुकतो आहोत, अथवा, किती मोठ्या प्रमाणावरील रोजगार संधींचा मार्ग विरोधापायी अवरुद्ध होतो आहे, यांबाबत विविध माध्यमांद्वारे सध्या जे सांगितले जाते आहे त्याबाबत अंमळ तरतम भावच आपण बाळगला पाहिजे. तसेच, हे चित्रही केवळ एकांगीच आहे, याचेही भान आपण ठेवावयास हवे. 'सेझ'ला विरोध दर्शविल्याने किती मोठ्या प्रमाणावरील रोजगार संधींस आपण मुकणार आहोत (?) हे सांगणारी हीच माध्यमे त्याच 'सेझ'साठी भूसंपादन कायद्याचा अवलंब करून पिकाखालील

जमिनी सरकारने काढून घेतल्याने किती शेतकरी देशभरात देशोधडीस लागणार आहेत त्यांची आकडेवारी मात्र प्रकाशात आणत नाहीत ! ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेतल्या जातील त्या शेतकऱ्यांना सरकार भले काही नुकसानभरपाई देईलही. मात्र, ही नुकसानभरपाई किती असणार आहे, ती नेमकी केव्हा मिळणार, मिळाली तरी कोठवर पुरणार हे सारे प्रश्न खाली उरतातच. परंतु, प्रश्नांच्या याच जंजाळाचा एक धागा हा पर्यावरणाच्या संगोपन-संवर्धन-संरक्षणाशीही जोडलेला आहे. शेतकऱ्यांकडून संपादन केलेल्या जमिनींची नुकसानभरपाई सरकार फारतर देईल, परंतु, चांगली उपजाऊ, पिकाखालील, लागवडीयोग्य जमीन उद्योगांसारख्या बिगरशेती वापरासाठी जेव्हा उपयोजिली जाते तेव्हा एकापरीने पर्यावरणाच्या, निसर्गाच्या अनेक वर्षांच्या कामगिरीवर आपण जे आक्रमण करीत असतो त्याची भरपाई सरकार अथवा कोणीही कशी करणार, या प्रश्नाचे आपल्याकडे काय उत्तर आहे ? मातीचा केवळ एक इंचाचा थर तयार होण्यात निसर्गाची कित्येक वर्षांची कामगिरी खर्ची पडलेली असते. त्या प्रदीर्घ कामगिरीद्वारे निर्माण झालेली सुपीक माती लागवडयोग्य बनते. अशी पिकाऊ जमीन आपण उद्योगांसाठी उपलब्ध करून देतो, ती लागवडयोग्य जमीन ज्या शेतकऱ्यांकडून काढून घेतो आणि त्यांबद्दल त्यांना नुकसानभरपाई देतो तेव्हा आपण केवळ भूक्षेत्राचा भाव अदा करत असतो. मात्र, निसर्गाने वेचलेल्या तपश्चर्येचे मोल आपण कसे अदा करणार असतो ? लागवडयोग्य जमिनीची झालेली हानी ही नुकसानभरपाईच्या कोणत्याही कोष्टकात न बसणारी, अशीच आहे, याचे भान आपल्याला असते का ?

सगळ्यात वादग्रस्त मुद्दा आहे तो 'सेझ'च्या क्षेत्रात प्रवेश करू इच्छिणाऱ्यांना, तेथे निवास करणाऱ्यांना अथवा तेथे काम करणाऱ्या कर्मचारीवर्गाला ओळखपत्राची सक्ती करणाऱ्या कायदेशीर तरतुदीचा. एखाद्या खासगी कंपनीच्या आवारात अथवा इमारतीत प्रवेश करताना ओळखपत्राची अट ही समर्थनीय आहे. मात्र, देशातील एखाद्या संपूर्ण भूभागावरच ओळखपत्राशिवाय फिरता येत नाही, ही तर भारतीय घटनेने प्रत्येक भारतीय नागरिकाला बहाल केलेल्या संचारस्वातंत्र्यासारख्या मूलभूत अधिकाराची पायमल्लीच आहे. म्हणूनच 'सेझ'च्या कायद्यातील हे कलम पूर्णतः घटनाविरोधी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात संस्थानांच्या हद्दीत प्रवेश करण्यासही ओळखपत्रांची आवश्यकता नव्हती. आता स्वतंत्र भारतात, देशाच्याच काही क्षेत्रावर हिंडण्याफिरण्यासाठी, प्रवेश करण्यासाठी ओळखपत्राची कायदेशीर सक्ती व्हावी ही नवीनच संस्थानशाही आणि वसाहतवाद आहे !

# प्रमुख संदर्भ

सामूहिक ज्ञानाच्या संधींकडे - (1)www.Worldchanging.com, (2) www.thetyee.ca (3)www.truthforce.info (3)NewScientist 25 Nov, 2006 (4) A Society of Seers, Walrus Magazine, 21 Nov, 2006 (5) Can Civilization Rise from it's Ashes ? Thomas Homer-Dixon (6) There may just be hope for humanity yet, The Georgia Straight, 23 Nov, 2006 (7) The End of Ingenuity, New York Times, Nov 29, 2006 (8) Thomas Homer-Dixon's Response to Toronto Globe and Mail, 12 Dec, 2006 (9)NewScientist 3 Feb, 2007.

'सेझ' - (1) www.chinaunique.com (2)www.worldwide-tax.com/china (3) www.moneycontrol.com(4)www.asianperspective.org(5)www.thehindubusinessline.com (6)www.indeconomist.com (7) Manual on SEZ, FT and WZ, IFSC - Developers and Entrepreneurs (includind other export oriented units such as AEZ, STP, BTP, EHTP and 100% EOU) by Rajkumar S. Adukia, Book Corporation, Second Edition, October 2006, Kolkata.

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक अॅन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## विश्वाचा मूळ घटक गाव, ग्रामगीता त्यासाठी...

*ग्राम म्हणजे देवमंदिर/ मानव देवमूर्ती सुंदर/*
*सर्वांची सेवा समप्रकार/ तीच पूजा आमुची//*
*ग्रामगीता नव्हे पारायणासि/ वाचता वाट दावी जनासि/*
*समूळ बदलवी जीवनासि/ मनी घेता अर्थ तिचा//*
*ही नव्हे फुले टाकण्यासाठी/ ही ग्रामाची उद्धारदृष्टि/*
*आजच्या युगाची संजीवन बुटी/ मानतो आम्ही ग्रामगीता//*
*ग्रामगीतेचे फळ नव्हे एकट्यासि/ एकासहित आहे ग्रामासि/*
*उद्धरतील गाववासी/ वाचूनि वर्तता ग्रामगीता//*
*गावी वाढेल संघटना/ बळ लाभेल सकळांच्या मना/*
*नांदेल विश्वकुटुंबाची रचना/ आपुल्या गावी//*
*जे जे नारी, नर साक्षर असती/ त्यांना माझी नम्र विनंती/*
*वाचा ग्रामगीता, अर्थसंगति/ समजावोनि द्या निरक्षरा//*
*ग्रामगीता ग्रंथ सुंदर/ निर्मावया गावाचे चारित्र्य/*
*प्रचार करावा सर्वत्र/ होऊनि पवित्र आपणहि//*
*प्रथम ऐकावे हे गीतावचन/ आचरणासि दृढ करावे मन/*
*मग संकल्पावे कार्याचे साधन/ ग्राम स्वर्ग करावया//*
*प्रथम श्रद्धेने वाचन करावे/ अर्थ सर्व लक्षात घ्यावे/*
*उठता बसता कार्यास लागावे/ ग्रामाच्या आपुल्या//*

(ग्रामगीता: अध्याय ४१)

‘ग्रामगीता’कार तुकडोजींचे अंतरंग ‘ग्रामगीते’च्याच शब्दांद्वारे न्याहाळण्याचा प्रयत्न गेले सुमारे दीड वर्ष आपण सगळ्यांनी केला. या गीतापठणाचा समारोप आता या ठिकाणी आपण करीत आहोत. इथे ‘समारोप’ याचा अर्थ हा की आता ‘पठण’ संपले, इथून पुढचा प्रांत हा आचरणाचा. या प्रांतात साम्राज्य कृतीचे, शब्दांचे नाही. तुकडोजींनाही नेमके हेच अपेक्षित आहे. कार्यप्रवणता हा गीतेचा प्राण आहे. मग ती भगवद्गीता असो वा ग्रामगीता. आपल्या एकंदरच समाजात बोलक्या सुधारकांचे

अफाट पीक कायमच पिकलेले असते. वाण असते ती कर्त्या सुधारकांची. बोलण्यात आपण जेवढी वाफ दवडतो ती सगळी प्रत्यक्ष कामाकडे वळवली गेली तर विकासाचे इंजिन अधिक वेगाने धावेल. त्या विकासाचे सुभग परिणाम तळागाळापर्यंत झिरपतील. हे घडत नसल्यामुळेच, एकीकडे बेढब वाढलेली अनारोग्यपूर्ण शहरे आणि दुसरीकडे विकासाच्या संजीवनीला पारखी झालेली जरत्कारू खेडी, असे विषण्ण चित्र आज देशभरात दिसते आहे. तेही पुन्हा स्वातंत्र्याच्या हीरक महोत्सवी वळणावर, १० पंचवार्षिक योजना उलटून गेल्यानंतर ! या सगळ्यातून निष्पन्न झाले ते इतकेच की 'गाव' आणि 'शहर' यांतील दरी गेल्या ६० वर्षांत सातत्याने रुंदावतच गेली. ही दरी जेवढी प्राकृतिक आहे त्याहीपेक्षा ती मानसिक अधिक आहे. किंबहुना, ही मानसिक दरीच अनुल्लंघ्य बनलेली असल्याने प्राकृतिक दरी दिवसेंदिवस सघन बनते आहे. त्यातच, गेल्या सुमारे दीड दशकात घडून आलेल्या बदलांचे लाभ पदरात पडल्याने कानात वारे शिरलेल्या शहरी नवश्रीमंतांच्या डोळ्यांसमोर तर इतके गडद धुके साठले आहे की, 'खेडी' नावाचा काही एक प्रकार आपल्या देशात शिल्लक आहे, अजूनही एकूणांतील जवळपास ७० टक्के जनता त्या खेड्यांत वास करते, खेड्यांमध्ये जगणाऱ्यांनाही 'माणसे'च म्हणतात, त्यांच्याही काही गरजा असतात, त्या गरजांची पूर्तता करण्याची जबाबदारी सरकारइतकीच आपलीही आहे, या कशाकशाचाही मागमूस त्यांच्या विचारविश्वात अणुमात्रही दिसत नाही. या अशा निबर जगण्यातून एक प्रकारची बेगुमानी पोसली जाते. 'खेडी' आणि 'शहरे' हे द्वैत परिपुष्ट होते ते त्यामुळेच. या बेगुमानीपायी शहरी आयुष्याला कुंपणे पडतात. 'मल्टिप्लेक्स' आणि 'मॉल' यांच्या पल्याड मग या कुंपणांच्या सीमा विस्तारतच नाहीत. 'गाव' आणि 'शहर' यांतील मानसिक दरी अनुल्लंघ्य बनते ती यापायीच. 'सेझ'च्या आजच्या संघर्षाचा खरा गाभा हाच आहे. 'ग्रामगीते'चा खटाटोप तुकडोजींनी स्वातंत्र्याच्या आगेमागेच करावा यांत त्यांच्या ठायीच्या सम्यक् दृष्टीइतकेच त्यांच्यातील द्रष्ट्या समाजमनस्काचे मनोहर दर्शन घडते. 'सस्टेनेबल डेव्हलपमेन्ट', 'इन्क्लुसिव्ह् डेव्हलपमेन्ट', 'बॅलन्स्ड डेव्हलपमेन्ट' यांसारख्या, आजकाल परवलीच्या बनलेल्या यच्चयावत संज्ञा तुकडोजींच्या गावीही नसतील. मात्र, 'ग्रामगीते'च्या पानोपानी व्यक्त झालेले तुकडोजींचे मन याच संकल्पनांना आधारभूत असणाऱ्या प्रेरणांनी सिंचित झाले होते, हे मात्र निःसंशय. याच प्रेरणांचा नव्याने आणि जोमाने जागर करण्याची कडोविकडीची निकड आज निर्माण झाली आहे. पूर्वी कधीही नव्हती एवढी !

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे नवे प्रकाशन

आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ

# कर्ता-करविता

### आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

● मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रुपये

**ग्रंथ घेणाऱ्यांना अर्थबोधपत्रिका मासिक एक वर्ष विनामूल्य**

## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

(१ जून २००६ पासून)

वार्षिक वर्गणी फक्त १०० / - रुपये

द्वैवार्षिक वर्गणी फक्त १८० / - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

त्रैवार्षिक वर्गणी फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट

पंचवार्षिक वर्गणी फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

## दृष्टीआडची अमेरिका

**- गोविंद तळवलकर**

भारतीयांना अमेरिका ही काही अपरिचित नाही. हजारो लोक तिकडे जातात व तिथे वास्तव्य केलेले कित्येक लाखांत मोजावे लागतील. शिवाय वृत्तपत्रे व टेलिव्हिजन यांच्यामुळे अमेरिकाच काय सर्व जग जवळ आले असून इंटरनेटने दळणवळण सुलभ झाले आहे. मी चार वर्षांनंतर इथे आलो आणि काही वेळा टेलिव्हिजनवरचे कार्यक्रम पाहिले तेव्हा काही कार्यक्रमांत - त्यातही हिंदी व इंग्रजी कार्यक्रमांत - भाग घेणाऱ्यांचे हावभाव बघता अमेरिकेतील टेलिव्हिजन वाहिन्यांवरील अशाच कार्यक्रमांत भाग घेणाऱ्यांची ती नक्कल चाललेली दिसली. ही भ्रष्ट नक्कल, स्पष्ट सांगायचे तर, हास्यास्पद व उबग आणणारी आहे.

अनेक वेळा वृत्तपत्रांतील लिखाण व टेलिव्हिजनवरील बातम्या तसेच चर्चा ऐकल्यानंतर अमेरिकी राजकीय व सामाजिक जीवनासंबंधी गैर वा अपुरी माहिती असल्याचे माझे मत झाले. एक उदाहरण द्यायचे तर पावणेदोन वर्षांनी होणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकीचे देता येईल. अमेरिकी पद्धतीप्रमाणे डेमोक्रॅटिक व रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवारांना त्यांच्या पक्षीय सभासदांचे मत प्रथम घ्यावे लागते. यात आयोवा, न्यू हॅम्पशायर इत्यादी ठिकाणच्या मतदारांना विशेष महत्त्व असते. दोन्ही

---

*ज्येष्ठ व व्यासंगी पत्रकार आणि 'महाराष्ट्र टाइम्स' चे माजी संपादक गोविंद तळवलकर हे गेली काही वर्षे अमेरिकेत वास्तव्य करीत आहेत. प्रसारमाध्यमांद्वारे सर्वसाधारणपणे अमेरिकेचे जे चित्र आपल्यासमोर येते त्यापेक्षा अमेरिकेचे जे वेगळे रूप तळवलकर यांना प्रतीत झाले त्याचे शब्दचित्र त्यांनी भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीमध्ये २० फेब्रुवारी २००७ रोजी आयोजित केलेल्या चर्चासत्रात रेखाटले. 'दृष्टीआडची अमेरिका' या विषयावर तळवलकर यांनी चर्चासत्रात केलेले संपूर्ण भाषण या ठिकाणी सादर केले आहे.*

पक्षांचे जे कोण उमेदवार असतील त्यांतून ज्या उमेदवारास सर्वांत अधिक मते पडतील तो त्या पक्षाचा अध्यक्षपदासाठीचा अंतिम उमेदवार ठरतो. ही प्राथमिक गोष्टी सांगण्याची गरज नाही.

तथापि, डेमोक्रॅटिक व रिपब्लिकन पक्षांचे जे उमेदवार प्राथमिक निवडणूक लढवणार आहेत त्यांच्याबाबत आणि त्यांच्या यशस्वितेसंबंधी थोडी अधिक माहिती करून घेणे युक्त होईल. रिपब्लिकन पक्षाच्या इच्छुकांत जॉन मॅकेन हे सेनेटर आणि न्यूयॉर्कचे माजी महापौर रुडी ज्यूलियानी यांना महत्त्व आहे. इथल्या एक-दोन इंग्रजी पत्रांत ज्यूलियानी हे सर्वांत लोकप्रिय असून त्यांना यशाची खात्री असल्याचे विश्लेषण वाचले. डेमोक्रॅटिक पक्षाचे सात-आठ इच्छुक आहेत व त्यात हिलरी क्लिन्टन व बराक ओबामा हे दोघेही सिनेटर वरच्या क्रमांकावर आहेत. न्यूयॉर्कवर दहशतवाद्यांनी ११ सप्टेंबर २००१ रोजी हल्ला केला तर सर्व जगालाच ते अचाट कृत्य धक्का देणारे ठरले. त्या वेळी हाहाकार माजला असता महापौर या नात्याने ज्युलियानी यांनी अभूतपूर्व अशी कामगिरी बजावली. त्या हल्ल्याच्या दिवशी अध्यक्ष बुश आठ-दहा तास इकडून तिकडे असे आसरा शोधत फिरत होते आणि त्या वेळी, ‘आपला अध्यक्ष कोठे आहे ?’ असा प्रश्न अमेरिकन लोकांना पडला. खुद्द न्यूयॉर्कला बुश यांनी चार दिवसांनी भेट दिली. या पार्श्वभूमीवर ज्युलियानी यांची कामगिरी वाखाणण्यासारखी होती. असे असले तरी रिपब्लिक पक्षाच्या प्राथमिक चाचणी मतदानात ज्युलियानी यांना यशाची पूर्ण खात्री असल्याची ग्वाही देणे हे धाडसाचे होईल. कदाचित ते यशस्वी होतील, कदाचित नाही. काही इंग्रजी पत्रांप्रमाणे यशाची खात्री बाळगणे योग्य नाही. याचे प्रमुख कारण हे आहे की, रिपब्लिकन पक्षास गेल्या काही वर्षांत व त्यातही बुश यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीचा प्रारंभ झाल्यापासून आलेले स्वरूप ज्युलियानी यांना अनुकूल नाही. हे स्वरूप म्हणजे दुराग्रही धर्माभिमान, वैज्ञानिक दृष्टीकोनाचा त्याग करून धर्मवादाचा स्वीकार हे आहे. यामुळे अनेक सामाजिक प्रश्नांच्याबाबतीत प्रतिगामी भूमिका घेतली जाते.

गर्भपात हा विषय अमेरिकेतील राजकीय दुफळीचा होऊन राज्यपातळीवरची विधिमंडळे, प्रतिनिधी सभा व सेनेटपासून न्यायाधीशांच्या नेमणुकीपर्यंत, गर्भपाताचा निर्णय संबंधित स्त्रीने घ्यायचा की सरकार व न्यायाधीश यांनी, हा मोठा वादाचा विषय होऊन बसला आहे. बुश यांनी हा अधिकार सरकारकडे असण्याची भूमिका घेऊन, अगदी तुरळक उदाहरणे सोडल्यास, सरसकट गर्भपात बेकायदा आणि

अनैतिक ठरवला आहे. सर्वोच्च न्यायालयावर न्यायाधीशांच्या नेमणुका करताना ते ही कसोटी लावतात. प्रसूतीनंतर नाळेवर संशोधन करून काही औषधे तयार केल्यास कंपवातापासून अनेक रोगांवर उपाय निघण्याची शक्यता असल्याचे शास्त्रज्ञ सांगत असले तरी बुश प्रशासन या विरुद्ध आहे.

अमेरिकेत समलिंगी संबंध व अशा व्यक्तींचे विवाह हा विषय वादाचा आहे. बुश यांचा अशा विवाहांना विरोध आहे. रिपब्लिकन पक्षातील बहुसंख्य कार्यकर्ते व नेते या प्रत्येक बाबतीत बुश यांचे पाठिराखे आहेत. ज्युलियानी बरोबर त्या विरुद्ध असून सरकारने हस्तक्षेप करण्यास त्यांचा विरोध आहे. अमेरिकेत केवळ रिपब्लिकन पक्षातच सनातनी वृत्ती बळावलेली नाही. डेमोक्रॅटिक पक्षातही ती बऱ्याच प्रमाणात आहे. या स्थितीत भारतातल्या काही वृत्तपत्रांना ज्युलियानी यांच्या 'महापौर' या नात्याने केलेल्या कामगिरीचे महत्त्व वाटत असले तरी, जो रिपब्लिकन पक्ष प्राथमिक चाचणीत उमेदवार ठरवणार त्याच्याशी ज्युलियानी यांची भूमिका जुळणारी नाही. हा पहिला अडसर ओलांडल्यावरही जी दाक्षिणात्य राज्ये आहेत आणि जी 'बायबल विभाग' म्हणून ओळखली जातात तेथील मतदार ज्युलियानी यांच्या बाजूला वळतील की नाही याबद्दल संशय बाळगण्याजोगी स्थिती आहे.

जॉन मॅकेन हे स्वच्छ चारित्र्याचे आणि कट्टर देशभक्त म्हणून गणले जातात. व्हिएतनाम युद्धातही ते कैदी झाले होते व पाच वर्षे त्यांनी हालात काढली. यामुळे 'नैतिक पुढारी' असा त्यांचा लौकिक झाला असला तरीपण त्यांचेही पाय मातीचे आहेत. कर्मठ धर्मवाद्यांशी त्यांचे जुळत नव्हते. पण अध्यक्षपदाचे गाजर दिसल्यानंतर त्यांनी या कर्मठवाद्यांची खुशामत सुरू केली आहे. गर्भपात, समलिंगी संबंध व विवाह इत्यादी बाबतींतील आपली भूमिका बदलून त्यांनी कर्मठ पंथियांचा मार्ग स्वीकारला आहे. इराक युद्ध फसल्याचे उघड दिसत असले तरी मॅकेन यांनी बुश यांच्याही पुढे मजल मारून युद्धाचे समर्थन चालवले आहे. बुश २१ हजारांहून अधिक सैन्य पाठविण्यास निघाले असता मॅकेन यांना लाख वा दोन लाख वा त्याहून अधिक सैनिक पाठवणे आवश्यक वाटते. अशा दृष्टीने परराष्ट्र धोरण असो वा सामाजिक असो, मॅकेन प्रतिगामी भूमिका घेत आहेत. यामुळे रिपब्लिकन पक्षाची उमेदवारी मिळेल पण अमेरिकेत जनमत वाढत्या प्रमाणात युद्धविरोधी बनत असता निवडणुकीत यश मिळेलच याची खात्री देता येत नाही.

डेमोक्रॅटिक पक्षाच्या इच्छुकांत हिलरी क्लिंटन व ओबामा यांचा क्रम वरचा आहे. लोकमताचा व त्यातही डेमोक्रॅटिक पक्षाच्या मतदारांचा कौल पाहिला तर हिलरी यांचा क्रम पहिला लागतो व दुसरा ओबामा यांचा. बिल क्लिंटन हे लोकप्रिय वक्ते आहेत आणि राजकीय डावपेचांत वाकबगार आहेत. त्यांच्या या गुणांचा त्यांच्या पत्नीला उपयोग होईल असे वाटणे साहजिकच आहे. दुसऱ्या क्रमांकांचे उमेदवार ओबामा हे आफ्रिकन-अमेरिकन वा कृष्णवर्णीय आहेत. त्यांनी इराकच्या युद्धास प्रारंभापासून विरोध केला तर हिलरी या, या युद्धाच्या कट्टर समर्थक होत्या. गेल्या काही महिन्यांत त्यांचा सूर बदलला. हे युद्ध बुश प्रशासनाने योग्य रीतीने चालवले नसल्याची टीका त्या करतात. म्हणजे युद्ध तत्त्वतः व मूलतः चूक, असे त्यांचे म्हणणे दिसत नाही.

अध्यक्षांची पत्नी या नात्याने हिलरी यांनी प्रशासन जवळून पाहिले. त्यांचा काही सामाजिक प्रश्नांबाबत अभ्यास आहे आणि सेनेटमध्ये त्यांनी लक्षणीय कामगिरी केली. ओबामा यांना सेनेटचा अनुभव तीनएक वर्षांचा आहे. पण अध्यक्षपदासाठी अनुभव, राजकीय व आंतरराष्ट्रीय ज्ञान नसले तरी चालते, हे बुश यांनी दाखवून दिले असल्यामुळे अनुभवाचा अभाव या कारणास्तव त्यांच्यावर टीका करता येणार नाही.

परंतु हिलरी व ओबामा यांच्या मार्गात सर्वांत मोठा अडथळा आहे तो सर्वसामान्य अमेरिकेनांच्या मनोभूमिकेचा. अमेरिका संपन्न आहे, कारखानदारीत वरचढ आहे. हे सर्व खरे असले तरी सामाजिक बाबतीत मागासलेली असून ती अधिकाधिक कर्मठ होऊ लागली आहे. कट्टर धर्मवाद्यांचा प्रचार व त्यामुळे बेभान होणारे श्रोते पाहिल्यावर नाझींच्या सभांची आठवण होते. या अशा प्रतिगामी वृत्तीमुळे स्त्रिया विशिष्ट मर्यादेपलीकडे राजकीय अधिकारपद मिळवू शकत नाहीत. गेल्या नोव्हेंबरमध्ये प्रतिनिधीसभेच्या निवडणुकीच्या वेळी डेमोक्रॅटिक पक्षाला मत न देण्याचा प्रचार करताना सर्वांत महत्त्वाचा मुद्दा कोणता मांडला गेला असेल याचा शोध घेतल्यास असे दिसेल की डेमोक्रॅटिक पक्षाच्या प्रतिनिधीसभेतील नेत्या होत्या नॅन्सी पलोसी. अमेरिकन घटनेप्रमाणे राष्ट्राध्यक्ष व उपराष्ट्राध्यक्ष यांना कोणत्याही कारणाने अधिकारपद सोडावे लागले वा ते मरण पावले तर प्रतिनिधीसभेचा जो कोणी अध्यक्ष असेल तो राष्ट्राध्यक्ष बनतो.

आत्तापर्यंत प्रतिनिधीसभेच्या अध्यक्षपदी पुरुषच होते. नॅन्सी पलोसी या त्या पदासाठी उभ्या असलेल्या पहिल्या महिला. बुश वा चेनी यांना पद सोडावे लागले तर पुढील निवडणुका होईपर्यंत त्या - नॅन्सी पलोसी - राष्ट्राध्यक्ष होतील. एक महिला राष्ट्राध्यक्ष होणे हे बहुसंख्य अमेरिकनांना धक्कादायक वाटते. ओल्डा मायर, इंदिरा

गांधी, सिरीमाओ भंडारनायके, मार्गारेट थॅचर इत्यादी स्त्रिया आपापल्या देशांच्या प्रमुखपदी होत्या; पण अमेरिकेच्या इतिहासात हे झाले नाही. तुम्ही बारकाईने चौकशी केली तर असे दिसेल की स्त्रिया व कृष्णवर्णीय लोक यांना मोटरच्या विम्याचा हप्ता गोऱ्या पुरुषांपेक्षा बहुतेक वेळा अधिक द्यावा लागतो. एखाद्या स्त्रीचा नवरा व मित्र यांनी तिच्याप्रमाणे मोटर खरेदी केली किंवा घराच्या विम्याबाबत बोलणी केली तर कमी हप्ता पडतो. एकट्या स्त्रीला तोच जास्त पडतो. अमेरिकनांची ही मनोभूमिका आणि हा व्यवहार हिलरी व ओबामा यांना विशेष अनुकूल नाही. याचा अर्थ त्यांच्यापैकी कोणी यशस्वी होणार नाही, असा नाही. इतका ठाम विश्वास बाळगण्याजोगी मात्र परिस्थिती नाही. इतक्या खोलात न जाता काही भाष्यकार ज्युलियानी, हिलरी व ओबामा यांच्या भवितव्यासंबंधी ठाम मतप्रदर्शन करताना पाहिले की आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. ते दोन्ही एकत्र आले तर यशाची शक्यता अधिक आहे.

अमेरिकन प्रशासनाचे एक वैशिष्ट्य लक्षात घेण्यासारखे आहे. अध्यक्षाची कारकीर्द चार वर्षांची असते व फेरनिवडणूक जिंकली तर आठवर्षांची असते. या काळात अर्थ, संरक्षण, परराष्ट्र इत्यादी अनेक खात्यांचे प्रमुख व उपप्रमुख अध्यक्ष ज्या राजकीय विचारांचा असेल त्याच्याशी सुसंवादी असे नेमले जातात. ब्रिटन वा आपल्या देशात, सरकारी अधिकारी व नोकर पक्षाला बांधील असू नयेत, असा संकेत आहे. तसा अमेरिकेत तो नाही. नुकतेच निवृत्त झालेले रम्सफिल्ड हे एक काळ व्हाइट हाऊसमध्ये कारभार यंत्रणेचे प्रमुख होते. नंतर ते संरक्षणमंत्री नेमले गेले. हे रिपब्लिकन राजवटीत झाले. ती राजवट संपल्यावर रम्सफिल्ड उद्योगधंद्यात शिरले. तेथे मोठे व्यवस्थापक होऊन गडगंज श्रीमंत झाले. मग बुश अध्यक्ष झाल्यावर त्यांची संरक्षणमंत्री म्हणून नेमणूक झाली. उपाध्यक्ष डिक चेनी यांची अशीच अवस्था आहे. सरकारी नोकरीत अधिकारपदे घ्यावी आणि मग खासगी धंद्यात जाऊन सरकारी यंत्रणेतील ओळखीचा फायदा कंपनीला करून द्यावा व आपणही घ्यावा अशी प्रथा तेथे रूढ आहे. अमेरिकेच्या प्रतिनिधीसभेचे व सेनेटचे सभासदही याप्रमाणे संसद व खासगी उद्योग यात ये-जा करतात.

याचे एक-दोन परिणाम झाले आहेत. खोलात जाऊन पाहिले तर असे दिसेल की अमेरिकेच्या दोन्ही प्रमुख राजकीय पक्षांत कमालीचा विरोध नाही. विशेषतः परराष्ट्र धोरण व आर्थिक धोरण यांत फार थोडी तफावत असते. भारताबरोबर अणुकरार करण्यास सर्वांत अधिक विरोध डेमोक्रॅटिक पक्षाचा होता, पण अखेरीस उद्योगाची

वाढ व आर्थिक हितसंबंध यांचा प्रभाव अधिक पडून हा करार संमत झाला. प्रशासन कोणत्याही पक्षाचे येवो ते आर्थिक हितसंबंध जपण्यात मागे राहत नाही. आपल्या अधिकाऱ्यांना व राज्यकर्त्यांना याचा अचंबा वाटतो. पण तेथील राजकीय व्यवस्थेचे स्वरूप लक्षात घेतल्यास असे आश्चर्य वाटणार नाही.

राज्यव्यवस्थेतील अधिकारी व कारखानदारी यांच्यातच देवाणघेवाण होते असे नव्हे. प्राध्यापक, बुद्धिजीवी व प्रशासन यांच्यातही ती होते. प्राध्यापक, अर्थ व राज्यशास्त्रज्ञ यांनी आपापल्या शिक्षणसंस्थांतून रजा घेऊन सरकारात विविध खात्यांत काम करण्याचा प्रघात अनेक दशके रूढ आहे. गालब्रेथ व इतिहासतज्ज्ञ श्लेसिंगर, मॉयनीहान इत्यादी यांची ठळक उदाहरणे आहेत. काही कंपन्यांतील तज्ज्ञांनाही याच प्रकारचे आमंत्रण मिळते आणि राष्ट्राध्यक्षांकडून आमंत्रण येणे हा मोठा सन्मान वाटतो व ते नाकारल्याची उदाहरणे क्वचित घडतात. याखेरीज काही अभ्यास मंडळे वा समित्या नेमल्या जातात आणि त्यांच्यावरही विद्यापीठातील त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या नेमणुका होतात. हे सर्व बरोबर की चूक, या वादात जाण्यात अर्थ नाही. पण एक गोष्ट मान्य करावी लागते की सरकारला तज्ज्ञांचा सल्ला मिळतो. तसेच या तज्ज्ञांनाही प्रशासन कसे चालते याचा जवळून अनुभव येतो. त्यामुळे त्यांनाही एकांगी विचार करून चालत नाही. याचा अर्थ तसा विचार होत नाही, असा नव्हे. व्यापार व उद्योग ही क्षेत्रे आणि राष्ट्राध्यक्ष व त्यांचे प्रशासकीय अधिकारी यांच्यात देवाणघेवाण होते. या दोघांनी एकमेकांविरुद्ध पवित्रा घेणे हेच आवश्यक आहे, अशी अमेरिकनांची समजूत नाही. अर्थात बुश यांच्या कारकीर्दीत व्यापार व उद्योग यांचा प्रशासनावरील प्रभाव व हस्तक्षेप खूपच वाढला. राज्यकर्ते व संसदेचे सभासद यांना आपापले कारखाने, उद्योग यांची माहिती देऊन अमेरिकन काँग्रेस व सरकार यांच्या धोरणास वळण देण्यासाठी काही हजार प्रतिनिधी वा लॉबिस्ट अमेरिकेत आहेत. या लॉबिस्टांचे संसदेच्या सभासदांशी संबंध नको तितके घनिष्ट झाल्याची उदाहरणे उजेडात आली आहेत. इतकेच नव्हे तर बुश प्रशासनाच्या काही धोरणांचा आराखडा या लॉबिस्टांनी तयार करून दिल्याचे लपून राहिलेले नाही.

पक्षीय राजकारणाला अमेरिकेने सोडचिठ्ठी दिलेली नाही. तरीही अमेरिकन काँग्रेसमधील दोन पक्ष हे तडजोडीने अनेक विधेयके संमत करतात. अध्यक्ष एका पक्षाचा व संसदेत बहुमत दुसऱ्या पक्षाचे असे अनेकदा होते. यामुळे एकमेकांवर वचक राहतो. संघर्षाचे प्रकारही होतात. क्लिंटन यांच्या वेळी रिपब्लिकन पक्षाचे संसदेत बहुमत होते आणि

प्रतिनिधीसभेचे अध्यक्ष गिंगरीज हे अतिरेकी प्रवृत्तीचे होते. त्यांनी अर्थसंकल्पच धुडकावून लावून काही काळ संसद व इतर अनेक खाती बंद केली. आपल्या पक्षाच्या हातून राष्ट्राध्यक्षपद गेले याचा रिपब्लिकन पक्षाला इतका राग आला की क्लिंटन यांना त्या पक्षाचे अनेक, 'राष्ट्राध्यक्ष' मानत नव्हते. क्लिंटन यांनी कोसावोमध्ये अमेरिकन सैन्य पाठवले, त्यास रिपब्लिकनांनी विरोध केला. बुश यांच्या वेळी मात्र चुकीच्या इराकी युद्धास विरोध हा देशद्रोह ठरविण्यात आला. यात आता बदल झाला आहे.

२००१ सालापासून जॉर्ज डब्ल्यू. बुश यांची राष्ट्राध्यक्षपदाची कारकीर्द सुरू झाली. तेव्हापासून पुढील पाच वर्षांत अमेरिकेतल्या काही प्रमुख संस्थांची अवस्था काय झाली हे पाहणे उद्‌बोधक ठरेल. प्रथम वायदेबाजाराची घसरण सुरू झाली. मंदीचा फटका बसला. अनेक कंपन्या दिवाळखोर बनल्या. यास त्या कंपन्यांचा गैरकारभार आणि बँका व पतसंस्थांशी त्यांनी केलेले संगनमत हे कारणीभूत होते. एन्रॉन हे त्याचे ठळक उदाहरण. एन्रॉन आपल्या प्रगतीच्या जाहिराती करत होती. पण अंतर्गतरीत्या ती पोखरली होती. मेरिन लिंच इत्यादी ज्या वित्तीय संस्था आहेत आणि ज्या वायदेबाजाराबद्दल सल्ला देतात; भाकिते करतात, त्यांनी जाणूनबुजून लोकांची दिशाभूल करून त्यांचे कोट्यवधी डॉलर्स बुडवले. या व्यवहारामुळे अमेरिकेतल्या वित्तीय संस्थांची प्रतिष्ठा धुळीला मिळाली.

अमेरिकेत कॅथॉलिक, प्रोटेस्टंट इत्यादी धर्मपीठेही प्रभावी आहेत. त्यातील अनेक धर्मगुरूंनी अनेक वर्षे लहान मुलांबरोबर केलेल्या गैरव्यवहाराची उदाहरणे शेकड्यांनी उजेडात आली आणि या चर्चना लाखो डॉलर्स भरपाई म्हणून भरावे लागले. मात्र त्यापायी चर्चची अब्रू धुळीला मिळाली आणि अनेक पायघोळ संतांचे खरे स्वरूप लोकांपुढे आले.

अमेरिकेत वृत्तपत्रांचा दबदबा बराच होता; परंतु इराकविरुद्ध युद्धाचे वातावरण बुश व त्यांचे सहकारी तयार करीत असताना न्यूयॉर्क टाइम्स, वॉशिंग्टन पोस्ट व इतर अनेक प्रतिष्ठित वृत्तपत्रांनी युद्धज्वर वाढविला. इराकपाशी संहारक अस्त्रे नाहीत आणि सद्दाम व अल् काईदा यांचा संबंध नाही असे पुरावे असताना बुश यांनी इराकविरोधी वातावरण तापवले, अत्यंत खोट्या बातम्या पसरवल्या आणि ही प्रतिष्ठित पत्रे, त्याचप्रमाणे अमेरिकी संसदेतील दोन्ही पक्षांचे नेते व सभासद आंधळेपणाने या बनावात सामील झाले. मात्र फार थोडे यास अपवाद होते.

बॉब वुडवर्ड हे नावाजलेले पत्रकार. वॉटरगेट प्रकरण उजेडात आणल्यामुळे ते व बर्नस्टिन प्रसिद्ध झाले; पण बुश यांच्या राजवटीसंबंधी त्यांनी लिहिलेली पहिली दोन पुस्तके म्हणजे टंकलेखकाचे (स्टेनोग्राफर) काम आहे. वुडवर्ड हे मोठे चलाख गृहस्थ आहेत. आपण विश्लेषण करत नाही, आपल्यापुढे आलेला पुरावा लोकांपुढे मांडतो, अशी भूमिका ते घेतात. बुश यांनी व त्यांच्या हस्तकांनी दिलेली माहितीच वुडवर्ड यांनी गृहीत धरली, ती तपासून पाहिली नाही. सहा महिन्यांपूर्वी त्यांचे नवे पुस्तक निघाले. त्यात त्यांनी टीकेचे लक्ष केले आहेत ते रम्सफिल्ड, चेनी व काही प्रमाणात कॉंडोलिझा राईस यांना. बुश यांच्यावर त्रोटक प्रमाणात टीका आहे. वुडवर्ड हे इराक युद्धाचा पाठपुरावा करणारे होते. म्हणून त्यांना बुश व त्यांचे प्रशासन यांच्याकडे इतका प्रवेश मिळाला. एक लबाड पण यशस्वी पत्रकार, अशी त्यांच्याबद्दल नोंद करावी लागते.

या रीतीने वित्तीय संस्था, धर्मपीठे आणि वृत्तपत्रे व टेलिव्हिजनच्या वाहिन्या यांची प्रतिष्ठा गेल्या पाच वर्षांत गेली आणि बुश यांची निवड सर्वोच्च न्यायालयाने करून न्यायसंस्थाच संशयित व पक्षपाती बनविली. २००० सालच्या निवडणुकीत फ्लोरिडा या राज्याचे गव्हर्नर असलेले बुश यांचे भाऊ व त्या राज्याचे गृहमंत्री यांनी भरपूर गैरव्यवहार केले. हजारो कृष्णवर्णिय मतदारांची नावे मतदार यादीतून गळाली आणि हजारो कृष्णवर्णिय मतदारांना मतदान करता येणार नाही, अशी अवस्था होती. सर्वोच्च न्यायालयाने या कशाचाच विचार केला नाही. कारण, न्यायालयावर रेगन व बुश यांच्या वडिलांनी नेमलेल्या न्यायाधीशांची संख्या अधिक होती. दोन वर्षांपूर्वी झालेल्या अध्यक्षीय निवडणुकीच्या वेळी हाच प्रकार एक-दोन राज्यांत झाला. मतदानाची इतकी सदोष यंत्रणा अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशात असावी, हे त्यांच्या राज्यकर्त्यांना लाच्छनास्पद आहे.

आता अमेरिकेच्या दुसऱ्या बाजूकडे वळू. ही बाजू उज्ज्वल आहे आणि अनुकरणीय आहे. तिथे लोक पूर्णतः सरकारवर अवलंबून नसतात. लोक व त्यांच्या संघटना पुढाकार घेतात. यात चर्चचाही भाग असतो. अमेरिकेत बहुसंख्य घरे लाकडाची व तकलुपी असतात आणि वादळे, पूर, आगी यांचे प्रमाण मोठे असल्यामुळे ही घरे केव्हा जमिनदोस्त होतील याचा नेम नाही. अशा वेळी सरकारची मदत होते; पण ती पुरेशी असेलच असे नव्हे; पण आसपासचे लोक पुढे येतात. घर पुन्हा बांधण्यास मदत करतात. सामान वगैरेंचा पुरवठा होतो. अमेरिकेत गरीब लोक कमी नाहीत.

चार कोटी लोकांना विमा नाही. त्यांना तो परवडत नाही. यामुळे औषधोपचाराची पंचाईत होते. पण त्यातल्या काहींना काही प्रमाणात मदत देणाऱ्या संस्था आहेत. अनेक गरीब लोकांना आपल्या नातेवाईकांचे साधे अंत्यसंस्कार करणे जड जाते. मग ते जाहीररीत्या मदतीची विनंती करतात आणि या आवाहनास प्रतिसाद मिळतो.

राज्य पातळीवरील निवडणूक असो वा नगरपालिकेची, शिक्षण, आरोग्य व निवारा यासाठी आपण काम करणार यासंबंधी खुलासा करण्यास उमेदवार प्राधान्य देतात. कोणी तलवारीचे प्रदर्शन करत नाही किंवा 'आपण म्हणजेच शहर' अशा वल्गना करत नाही. आमच्याकडील निवडणूक प्रचार दिवसेंदिवस अधिकाधिक हिंसक, गावातल्या दोन वा अधिक टोळ्यांमधील स्पर्धेच्या धर्तीवर होऊ लागला आहे. लोकांच्या प्रमुख गरजांना या प्रचारात प्राधान्य नाही.

अमेरिकेच्या काही भागात हिवाळा व उन्हाळा तीव्र स्वरूपाचा असतो. उन्हाळ्यात पंख्यांचा वारा पुरेसा होत नाही. वातानुकुलित सामग्री लागते. ती गरीब, एकेकटे राहणारे वयोवृद्ध यांना परवडत नाही; पण ती पुरवण्याचे पद्धतशील धोरण अमलात येते. या वातानुकुलित यंत्रणेमुळे विजेचे बील बरेच वाढते. ते गरिबांना परवडत नाही. यासाठी काही व्यक्ती, संस्था व काही वेळा नगरपालिका यात सूट देते. क्वचित वीज कंपनीही हातभार लावते. आणखी एक उपाय केला जातो. अमेरिकेच्या लहानमोठ्या गावांत वॉलमार्टसारखी दुकाने असतात. ती वातानुकुलित असतात. त्या त्या ठिकाणच्या टेलिव्हिजनच्या वाहिनीवरून गरीब लोकांना आवाहन केले जाते की त्यांनी अशा वातानुकुलित वास्तूंचा आश्रय घ्यावा. तसेच आवाहन कडाक्याची थंडी पडली की उबदार वातावरणात जाण्यासाठी केले जाते. आपल्याकडे हा उपाय करता येणार नाही. कारण लोकसंख्या इतकी प्रचंड आहे की याप्रमाणे आवाहन केल्यास कोणत्याच दुकानदारास आपला धंदा करता येणार नाही. 'थॅन्क्स् गिव्हिंग' हा नाताळ इतकाच मोठा सण असतो. त्या दिवशी गावागावात जे गरीब लोक असतील त्यांना मेजवानी दिली जाते. 'थॅन्क्स् गिव्हिंग'ला सर्वसामान्य लोक जे पदार्थ खातात ते या जेवणात असतात. या कामी गावातल्या सामाजिक संस्था, चर्च इत्यादींचा पुढाकार व सहभाग असतो.

अमेरिकेतील दानधर्म हा फारच मोठा आहे. सामान्य लोक तो करतात व स्थानिक पातळीवरील प्रश्न सुसह्य करण्यास मदत करतात. न्यूयॉर्कमध्ये सफाई कामगार म्हणून काम करून निवृत्त झालेल्या एका कृष्णवर्णिय महिलेने मरताना एक लाख

डॉलर्स मुलींच्या शाळेला देणगी म्हणून सहा वर्षांपूर्वी दिले. सुखवस्तू, श्रीमंत, अतिश्रीमंत हेही दानधर्मांच्या बाबतीत हात आखडता घेत नाहीत. याचा अर्थ असा नव्हे की श्रीमंतीत लोळणारे वाटेल तशी उधळपट्टी करत नाहीत. दोन वर्षांपूर्वी एका मोठ्या कंपनीच्या प्रमुख व्यवस्थापकाने आपल्या प्रेमपात्राच्या वाढदिवसासाठी खास विमान करून शंभर-दोनशे मित्रांना एका ग्रीक बेटावर नेऊन वाढदिवस कसा साजरा केला याची रसभरीत वर्णन येत होती. पुढे याच व्यवस्थापकावर कंपनीच्या पैशाचा घोटाळा करून ती बुडीत आणल्याबद्दल खटला झाला आणि त्याला शिक्षा झाली.

तथापि, या उलटही अनेक उदाहरणे आहेत. बिल गेट्स हे यात प्रमुख. त्यांनी आपल्या शाळेला ३५ कोटी डॉलर्सची देणगी दिली. केनेडी यांची बहीण स्वतः श्रीमंत आहे. ती न्यूयॉर्कमधील कृष्णवर्णियांच्या गरीब वस्तीत एक उत्तम शाळा चालवते. त्या उपक्रमात बिल गेट्स सहभागी आहेत. याशिवाय आफ्रिका खंडातील एड्स व मलेरिया यांना प्रतिबंध करण्यासाठी त्यांनी कोट्यवधी डॉलर्सचा निधी स्थापन करून व्यवस्थित काम चालवले आहे. न्यूयॉर्कमधल्याच एका कृष्णवर्णिय गृहस्थाने गरीब कृष्णवर्णिय मुलामुलींना अद्ययावत शिक्षण देण्यासाठी निधी जमा करण्याचे ठरवले. त्याला पैशाचा तुटवडा पडला नाही व त्यांची शाळा उत्तमपैकी चालू आहे. अनेक संशोधन संस्था परराष्ट्र धोरण, अर्थकारण, समाजकारण या विषयांना वाहिलेल्या आहेत. यातील काही राजकीय पक्षांना पूरक असतात. पण या सर्वांच्या संशोधनांची माहिती आपल्या विविध प्रश्नांच्या काही बाजू समजण्यास उपयुक्त ठरते. या संस्थांनाही पैशाची कमतरता भासत नाही.

अमेरिकेतील असंख्य शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे केवळ सरकारी अनुदान व फी यावर अवलंबून नाहीत. त्यांना भरपूर व भरघोस देणग्या मिळतात किंबहुना देणग्या मिळवणे हे विद्यापीठाच्या अध्यक्षाचे एक काम असते. या अशा संस्थांना मोठमोठ्या देणग्या देणाऱ्यांची वाण नाही. कित्येकजण प्रचंड ग्रंथभार जमा करतात व तो सार्वजनिक ग्रंथालये, महाविद्यालये वा विद्यापीठ यांना देणगी म्हणून देतात. न्यूयॉर्कमधील सार्वजनिक ग्रंथालय हे हेवा वाटावे असे आहे. त्यास प्रचंड प्रमाणात देणग्या मिळाल्या व मिळतात. एकाने काही कोटी किमतीचे उत्कृष्ट चित्रकलेचे नमुने या ग्रंथालयास भेट म्हणून दिले. या ग्रंथालयाचे दोन विभाग आहेत. एक सर्वसाधारण वाचकांसाठी तर दुसरी इमारत खास अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांसाठी आहे. ही इमारत नव्याने बांधली गेली. तिच्या अंतर्भागाची चित्रे व त्यातील विविध सोयी व उपकरणे पाहिल्यावर

आपण थक्क होऊन जातो. अमेरिकेत 'लायब्ररी ऑफ काँग्रेस' ही अत्यंत नावाजलेली संस्था आहे. जेफर्स्नने ती स्थापन करण्यात पुढाकार घेऊन ७०० ग्रंथांची देणगी दिली. आता तो महासागर झाला आहे. त्यातील ग्रंथसंपदा एकापुढे एक मांडली तर मुंबईपासून बेळगावपर्यंत पुस्तकांच्या अलमाऱ्या जागा अडवतील. जगाच्या कानाकोपऱ्यातून पुस्तके, हस्तलिखिते व वस्तू जमा केल्या जातात-व यासाठी पैसा कमी पडत नाही. तो केवळ सरकारी अनुदानाचा नसतो. फिलाडेल्फियाच्या सार्वजनिक ग्रंथ संग्रहालयात दोन कोटी ग्रंथ आहेत. पण केवळ तेथेच नाही तर अशी अनेक ग्रंथालये अमेरिकेत आहेत. शिकागो विद्यापीठच्या ग्रंथालयाचा मराठी विभाग सुसज्ज आहे.

एकेका विद्यापीठाने एकेका विद्याशाखेवर भर दिलेला दिसतो. हॉवर्डमध्ये चिनी व अरबी भाषांचा विशेष अभ्यास होतो. रशियाविषयक अभ्यासास प्राधान्य देणारी अनेक विद्यापीठे आहेत. यात चीन व मध्यपूर्व यांची भर पडली आहे. अनेक विद्यापीठे विज्ञानाच्या विविध शाखांच्या अभ्यासात व संशोधनात गुंतलेली आहेत. अशा रीतीने अभ्यास व संशोधन यात गुंतलेली विद्यापीठे आणि इतर संस्था यांनी अनेक देशांतल्या अभ्यासकांना आकर्षित केले आहे. रशियाने के. जी. बी., पॉलिट ब्यूरो इत्यादींची गुप्त कागदपत्रे मोकळी के ली तेव्हा लक्षावधी डॉलर्स खर्च करून हा सारा खजिना विकत घेण्यात येल विद्यापीठ व लायब्ररी ऑफ काँग्रेसचा पुढाकार होता. त्यांचा अभ्यास करणारे ग्रंथ प्रसिद्ध होतात. येल विद्यापीठाने तर एक ग्रंथमाला प्रसिद्ध करण्याचा संकल्प केला. तो अंमलात येत आहे.

जगभरच्या अभ्यासकांना अमेरिकेतील या सुविधा आकर्षित करतात. यात रशियन, फ्रेंच, ब्रिटिश, जर्मन, जपानी असे अनेक आहेत. काही भारतीयही आहेत. जगदीश भगवती हे अर्थशास्त्रज्ञ कोलंबिया विद्यापीठात आहेत. श्रीमती देसाई या हॉर्वर्डमध्ये असून, रशिया हा त्यांच्या अभ्यासाचा विषय आहे. त्या वर्षातून दोन-तीन वेळा रशियात जातात, विद्यापीठात शिकवतात वा परिसंवादांत भाग घेतात. हे तीसएक वर्ष चालू आहे. 'येल्तसिन ते पुतीन' असे त्यांचे नवे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले. स्टॅनफर्ड विद्यापीठत रॉबर्ट कॉन्क्वेस्ट हे साहित्यविषयक तज्ज्ञ असून ते ब्रिटिश आहेत. हे नव्वद वर्षांचे विद्वान अद्याप लेखन-वाचनात गुंग असतात. टेलिव्हिजनवर त्यांचे भाषण ऐकण्याचा योग आला. रशियन क्रांतीनंतरच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक जीवनावर अतिशय साक्षेपाने लिहिणारे लेखक म्हणून कॉन्क्वेस्ट यांनी लौकिक मिळवला आहे. 'हार्वेस्ट ऑफ सॉरो' हा त्यांचा ग्रंथ स्टालीनशाहीवर प्रकाश टाकणारा

असून, तो चुकवणे रास्त नाही. कॉन्क्वेस्ट हे रशियन व बल्गेरियन भाषेचे तज्ज्ञ आहेत. त्यांना इतरही काही युरोपीय भाषा येतात.

रॉडरिक मॅकफार्कर हे चीनविषयक तज्ज्ञ ब्रिटिश आहेत. ते हॉर्वर्डमध्ये आहेत. त्यांची पत्नी 'इकॉनॉमिस्ट' या साप्ताहिकात सहसंपादक होती. ती मुंबईत आली असता माझी तिची भेट झाली. नंतर मी लंडनला गेलो तेव्हा तिने तिच्या पतीची ओळख करून दिली. त्या वेळी ते मजूर पक्षातर्फे तिकडून गेलेले संसदसदस्य होते. त्यांनी राजकारण सोडले आणि चीनचा अभ्यास सुरू केला. 'चीनमधील सांस्कृतिक क्रांती' या विषयावर त्यांचे तीन ग्रंथ प्रसिद्ध झाले असून, त्यावरून त्यांच्या अभ्यासाची कल्पना येते. आता माओच्या शेवटच्या क्रांतीसंबंधी त्यांचा नवा ग्रंथ निघणार आहे. या ग्रंथासंबंधीची त्यांची विस्तृत मुलाखत व एक भाषण मी टेलिव्हिजनवर ऐकले.

ब्राऊन विद्यापीठ हे ऱ्होड आयलंडची राजधानी असलेल्या प्रॉव्हिडन्स या शहरी आहे. त्या विद्यापीठाचे ग्रंथालय मी पाहिले व काही दिवस त्याचा उपयोगही केला. त्यातील एक विभाग विविध देशांतील ब्रिटिश पलटणींसंबंधीचा आहे. प्रचंड मोठे नकाशाचे संग्रह आहेत आणि विविध देशांतील ब्रिटिश पलटणी कसे पोशाख करत हे लहान लहान पुतळ्यांमुळे समजते. अनेक ग्रंथ याच विषयावर आहेत. आणखी एक उल्लेखनीय विभाग म्हणजे जॉर्ज ऑर्वेलबद्दलचा. या विभागात ऑर्वेलच्या पुस्तकांच्या पहिल्या व दुसऱ्या आवृत्त्या व त्यांची काही पत्रे इत्यादी आहेत.

अमेरिकेतील सार्वजनिक ग्रंथालयांना सरकारी अनुदान मिळते. प्रत्येक नोकरदार व व्यावसायिकांच्या वर्षातील उत्पन्नातून काही रक्कम सरकार ग्रंथालयांसाठी कापून घेते. प्राप्तीकर असतो तसा हा ग्रंथालय कर आहे. यामुळे प्रत्येक गावात कामचलाऊ ग्रंथालय असतेच. मोठ्या गावात मोठी ग्रंथालये असतात. मी ह्यूस्टनला काही वर्षे होतो. तेथील सार्वजनिक ग्रंथालयाची आधुनिक इमारत तीन मजली आहे. अमेरिकेत सार्वजनिक ग्रंथालयांचा एक विशेष असा की एका वेळी किती पुस्तके घ्यावी यावर मर्यादा नाही. ह्यूस्टनला असताना मी रशियाविषयी ग्रंथ वाचत होतो. सार्वजनिक ग्रंथालयात प्रथम गेलो तेव्हा तेथे रशियाविषयक भरपूर पुस्तके दिसली. ग्रंथपालाला विचारले की 'किती पुस्तके मिळतील?' तसा तो म्हणाला, 'तुझ्या दोन हातांतल्या पिशवीत मावतील इतकी'.

परंतु या ग्रंथालयसेवेचा दुसरा विशेष महत्त्वाचा आहे. तुम्ही ज्या ग्रंथालयात जाता तेथे तुम्हाला हवे ते पुस्तक नसेल तर आंतरग्रंथालय व्यवस्था (इंटर लायब्ररी सर्व्हिस)

म्हणून एक सेवा आहे. तुम्हाला हव्या त्या पुस्तकांची नावे, लेखकाचे नाव वगैरे लिहून दिले की, आठ-दहा दिवसांत तुम्हाला ती पुस्तके मिळतात. त्यासाठी एक दीडकीही खर्च करावी लागत नाही. अगदी अपवादात्मक वेळा एखाद्या पुस्तकासाठी काही पैसे द्यावे लागतात. या यंत्रणेचा उपयोग पुस्तके मिळवण्यासाठी होतोच पण लेख मिळण्यासाठीही होतो. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा आढावा घेणाऱ्या माझ्या आगामी ग्रंथासाठी या ग्रंथसेवेकडून मला पुस्तके तर मिळालीच, पण लेखही मिळाले. असे जवळजवळ हजार लेख मी मिळवू शकलो. ही फार मोठी व उपयुक्त सेवा आहे.

अमेरिकेतील पुस्तकांच्या लहान-मोठ्या दुकानांचे वैशिष्ट्य नमूद केले पाहिजे. बहुसंख्य दुकानांत एखाददुसऱ्या कोपऱ्यात चांगले सोफा ठेवलेले असतात. तिथे बसून तुम्ही दिवसभर पुस्तके किंवा नियतकालिके वाचत बसला तरी त्याबद्दल कोणी काही विचारत नाही. भूक लागली तरी शेजारी खाद्यपदार्थ, चहा-कॉफी इत्यादी मिळण्याची व्यवस्था असते. प्रत्येक पुस्तक संग्रही बाळगण्याजोगे नसते, पण वाचणे बरे असते. अशा वेळी दुकानात जावे व हव्या तितक्या वेळ ते वाचत वा चाळत बसावे.

आपल्याकडे टेलिव्हिजनवर पुस्तकांबद्दल चर्चा करणे म्हणजे प्रकाशकांच्या पुस्तकांची फुकट जाहिरात करणे, अशी समजूत होती. आता काय आहे ते मला माहीत नाही. अमेरिकेत मात्र तशी समजूत नाही. अर्थात टेलिव्हिजन वाहिन्या फार खोलात जाऊन चर्चा करत नाहीत. याला अपवाद एक वाहिनी आहे. किंबहुना, तिचीच एक भगिनी असल्यामुळे दोन वाहिन्या आहेत असे म्हटले पाहिजे. या दोहोंपैकी एकीचे नाव आहे 'सी स्पॅन ए' व दुसरीचे 'सी स्पॅन बी.' अमेरिकन सरकार व काँग्रेस यांचा कारभार कसा असतो याची ओळख लोकांना करून द्यावी म्हणून 'सी स्पॅन' ही वाहिनी पंचवीस वर्षांपूर्वी सुरू झाली. अमेरिकेत काँग्रेसचे अधिवेशन चालू असते तेव्हा ते सर्व कामकाज ही वाहिनी प्रक्षेपित करते. काँग्रेसच्या सभागृहाच्या अर्थ, संरक्षण, परराष्ट्र धोरण, गुप्तमाहितीच्या यंत्रणा इत्यादींचे प्रमुख व त्यांचे दुय्यम यांना काँग्रेसच्या संबंधित विषयांच्या समित्या साक्षीरूप बोलावतात. मधूनमधून पण नियमितपणे चालणाऱ्या या चौकशीमुळे सरकारच्या धोरणाची व कारभाराची चांगली कल्पना येते. ही सर्व चर्चा 'सी स्पॅन'वर ऐकता येते.

'सी स्पॅन बी' ही ग्रंथचर्चेला वाहिलेली वाहिनी आहे. शनिवार व रविवार या दोन दिवस चोवीस तास हे कार्यक्रम असतात. शनिवार-रविवार जोडून सुटी असल्यास तीन-चार दिवस ही चर्चा ऐकता येते. याच 'सी स्पॅन'चे काही अधिकारी लेखकांशी

बातचीत करतात. अमेरिकेतील विद्यापीठे, अन्य संस्था, ग्रंथालये यांत विविध विषयांवर ग्रंथ लिहिणाऱ्यांची भाषणे होतात. काही परिसंवाद होतात. या साऱ्या चर्चा टेप क रून 'सी स्पॅन'वर सोयीप्रमाणे ऐकवल्या जातात. एका रविवारी एकापाठोपाठ एक अशा तीन उत्तम ग्रंथांवरील चर्चा ऐकल्या. त्यामुळे साडेतीन तास आनंदात गेले. यामुळे सहजासहजी ज्या विद्वानांचे भाषण ऐकण्याचा योग येत नाही तो येतो. मध्यंतरी कोल्कोव्हस्की या तत्त्वज्ञाचे भाषण ऐकण्याचा योग असाच आला.

ग्रंथालय, संस्था, विद्यापीठे यातील ग्रंथविषयक भाषणे, चर्चा व परिसंवाद यांचा एक विशेष लक्षात घेण्यासारखा आहे. लेखक आपला विषय समजून देणारे भाषण करतो. परिसंवादात ठरविलेल्या विषयाची उलटसुलट बाजू मांडली जाते. अनेकदा भाषणे असतात किंवा टिपणे असतात, वाटेल तसे भरकटत जाऊन भाषणबाजी केली जात नाही. आपल्याकडे पाहिल्यास प्रसंग साजरा करण्यासाठी काहीही केले जाते. वृद्धांच्या सभेत 'तुमच्या अनुभवाचा फायदा समाजाला करून द्या', असा उपदेश केला जातो, तर तरु णांच्या सभेत 'तुम्हीच समाजाचे खरे आधारस्तंभ' असल्याचे सांगून टाळ्या मिळवणे सोपे असते. कवी वा लेखक राजकीय वा आर्थिक विषयांवर मतप्रदर्शन करतात, तर राजकारणी लोकांना आपल्याला किती कविता पाठ आहेत हे सांगण्याचा मोह आवरत नाही. विषय ठरावीक नाही व बोलणे नेमके नाही.

अमेरिकेत 'सी स्पॅन'वर हा प्रकार दिसत नाही. वक्त्याचे भाषण तीस ते चाळीस मिनिटांत संपते. मग श्रोते प्रश्न विचारतात. श्रोत्यांची संख्या नेहमी प्रचंड असते असे नव्हे. काही वेळाच ती तशी असते. यात पंचवीस-तीसपासून चार-पाचशेपर्यंत श्रोते असले तरी उडवाउडवी होत नाही. लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की अनेक श्रोते पुस्तक वाचलेले असतात आणि ते प्रश्न विचारतात. हे वीसएक मिनिटे चालते. अशा रीतीने तासाभरात कार्यक्रम पार पडतो. प्रत्येक शनिवार-रविवार चर्चिल्या जाणाऱ्या ग्रंथात प्रत्येकाला रस असतो असे नव्हे, पण अनेकदा विचारांना चालना देणारी चर्चा ऐकायला मिळते. हा फार मोठा आनंद आहे आणि अमेरिकेचे खरे सामर्थ्य यामध्ये आहे.

✿✿

नियतकालिकांच्या मालकी हक्क व इतर तपशीलाबाबत फेब्रुवारीनंतर प्रसिद्ध होणाऱ्या पहिल्या अंकामध्ये प्रसिद्ध करावयाचे प्रगटन, नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबत केंद्र सरकारच्या १९५६ मधील नियम (क्रमांक ८)नुसार फॉर्म ४

| | |
|---|---|
| (१) नियतकालिकाचे नाव : | 'अर्थबोधपत्रिका' |
| (२) प्रकाशनस्थळ : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (३) नियतकालिकाचे स्वरूप : | मासिक |
| (४) प्रकाशकाचे नाव : | रामदास होनावर |
| राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| पत्ता : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (५) मुद्रकाचे नाव : | रामदास होनावर |
| राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| पत्ता : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (६) संपादकांचे नाव : | अभय टिळक |
| राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| पत्ता : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (७) मुद्रणस्थळ : | एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट,<br>२०५ शनिवारपेठ, पुणे - ४११०३० |
| (८) नियतकालिकाच्या मालकांचे किंवा एकूण भांडवलापैकी एक टक्क्यांहून अधिक भाग धारण करणाऱ्या भागधारकांची नावे व पत्ते : | 'इंडियन स्कूल ऑफपोलिटिकल इकॉनॉमी'<br>(भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी)<br>'अर्थबोध,' ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६ |

मी, रामदास होनावर, याद्वारे प्रमाणित करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

रामदास होनावर

दिनांक - १ मार्च २००७ (प्रकाशकाची सही)

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./180/VIII/2005
Postal Regn.No.: L-2/RNP/PNW/M 125/2007-2009
LICENCE NO. LWP-228
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग - व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका योग्य नमुन्यात प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

●अजित कर्णिक ●विकास चित्रे ●कुमुदिनी दांडेकर
●ललित देशपांडे ●द.ना. धनागरे ●आनंद नाडकर्णी ●सुहास पळशीकर
●रमेश पानसे ●मनोहर भिडे ●योगेंद्र यादव ●नीळकंठ रथ
●व्ही.एम्.राव ●ए.वैद्यनाथन ●रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**